

महर्षी
# विठ्ठल रामजी शिंदे

धर्मविषयक विचार

अशोक चौसाळकर

MR
922.94
Sh 63 C

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

# म. वि. रा. शिंदे यांचे धर्मविषयक विचार

इन्दराज
Entered

# म. वि. रा. शिंदे यांचे
# धर्मविषयक विचार

अशोक चौसाळकर

लोकवाङ्मय गृह

म. वि. रा. शिंदे यांचे धर्मविषयक विचार / अशोक चौसाळकर
M. V. R. Shinde Yanche Dharmavishayak Vichar / Ashok Chousalkar

Library IIAS, Shimla
MR 922.94 Sh 63 C
00124308

म/७१४
© अशोक चौसाळकर
पहिली आवृत्ति (I) : एप्रिल २००२

मूल्य : ३० रुपये

ISBN 81-88284-04-1

MR
922.94
Sh 63C
124308
31.3.08

मुद्रक / प्रकाशक :
प्रकाश विश्वासराव
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५ सयानी रोड
प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५

मुद्रणस्थळ :
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

माझी आई श्रीमती त्रिवेणीबाई चौसाळकर
हिच्या स्मृतीस अर्पण

# प्रस्तावना

गेल्या दोन वर्षांपासून म. वि. रा. शिंदे यांच्या जीवनकार्याचा परिचय करून देणाऱ्या एकूण चार पुस्तिका आम्ही प्रकाशित केल्या. म. फुले व डॉ. आंबेडकर यांच्यावरील पुस्तिकांप्रमाणेच या पुस्तिकांना वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. म. वि. रा. शिंदे यांचे धर्मविषयक विचार ही पुस्तिका या पुस्तक मालेतील पाचवी आणि शेवटची पुस्तिका असून त्यात म. शिंदे यांच्या धर्मविषयक विचारांचा विस्ताराने आढावा घेतला आहे.

म. शिंदे यांनी धर्मसाधनेस आपले जीवनकार्य मानले होते. ब्राह्मसमाज व प्रार्थना समाज यांच्या विचारांचा प्रसार करीत असताना त्यांनी आपले धर्मविषयक विचार मांडले. हे विचार मांडीत असताना भारतासमोर असणाऱ्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समस्यांची त्यांना तीव्र अशी जाणीव होती. त्यांच्या धर्मविषयक विचारात या समस्यांचे खोल असे प्रतिबिंब पडलेले आपणास दिसते. विज्ञान, कला आणि तत्त्वज्ञान यांच्या संदर्भात धर्मविचार मांडीत असताना म. शिंदे यांनी विकसनशील आणि यत्नशील माणूस केंद्रीभूत मानला. कारण संपूर्ण मानवजातीचा विकास त्यांना अभिप्रेत होता. धर्माचा खरा अर्थ समाजात समता निर्माण करणे हा आहे. त्यामुळे सबलाने दुर्बलास, शहाण्याने अज्ञान्यास व वरिष्ठाने कनिष्ठास सत्तेमध्ये आणि ज्ञानामध्ये समाविष्ट करून घेणे हा त्यांच्या मते खरा धर्म आहे. त्यात वैयक्तिक मोक्ष महत्त्वाचा नाही. मोक्ष पाहिजे तो सर्वांसाठी अशी म. शिंदे यांची या बाबतची भूमिका होती. त्यामुळे धर्माची व धर्म मानणाऱ्यांची कुचेष्टा न करता त्यामागे कार्यरत असणारी श्रद्धा आपण समजावून घेतली पाहिजे आणि त्या श्रद्धेला आशयसंपन्न, विधायक आणि प्रगतीस उपकारक रूप दिले पाहिजे असे म. शिंदे यांचे सांगणे होते. म्हणून प्रेमभावना व मानवाची सेवा यांच्या आधारावर उभी असलेली ज्योत जळती ठेवल्यावरच राष्ट्रातील वेगवेगळ्या चळवळींना खऱ्या अर्थाने जोम येईल असे त्यांचे सांगणे होते. सामाजिक विषमता दारिद्र्य आणि अन्याय यांचा निरास केल्याशिवाय अंधश्रद्धा दूर होणार नाहीत,

म्हणून त्यांच्या निर्मूलनास म. शिंदे यांनी धर्माचे प्रधान अंग मानले. आज धर्माचा विकृत राजकारणासाठी व समाजकारणासाठी वापर होत असताना धर्म व नीती या बाबतचे म. शिंदे यांचे विचार मार्गदर्शक ठरणार आहेत.

हे पुस्तक लिहिताना ज्येष्ठ विचारावंत प्रा. राम बापट यांनी केलेल्या सूचनांचा खूप उपयोग झाला. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. त्याचप्रमाणे ज्येष्ठ कामगार नेते कॉ. गोविंदराव पानसरे यांनी तगादा लावून हे काम माझ्याकडून करून घेतले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. सुंदर मुद्रणाबद्दल श्री. प्रकाश विश्वासराव व त्यांचे सहकारी यांचा मी आभारी आहे.

**— अशोक चौसाळकर**

## अनुक्रम


१. आधुनिक भारतातील धर्मसुधारणेच्या चळवळी १

२. म. वि. रा. शिंदे यांचे धर्मविषयक कार्य ६

३. म. वि. रा. शिंदे यांची आधुनिक भारतातील धर्मसुधारणा चळवळींची मीमांसा १२

४. म. वि. रा. शिंदे आणि भागवत धर्म १८

५. म. वि. रा. शिंदे यांची धर्मकल्पना २७

६. धर्म आणि नीती ३७

७. म. वि. रा. शिंदे यांचे धर्मविषयक विचार : चिकित्सक अभ्यास ४६

प्रकरण पहिले

# आधुनिक भारतातील धर्मसुधारणेच्या चळवळी

आधुनिक भारताच्या आणि महाराष्ट्राच्या इतिहासात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मोलाची कामगिरी बजावली. ते स्वत: कर्ते सुधारक होते. त्याचबरोबर धर्म आणि नीती याबाबत सूक्ष्म विचार करणारे थोर तत्त्वचिंतकही होते. आधुनिक भारतातील धर्मसुधारणेच्या चळवळींशी त्यांचा जवळचा संबंध होता. या चळवळींनी त्यांच्या वैचारिक जडणघडणीमध्ये मोलाची भूमिका बजावली. राजा राम मोहन रॉय, न्यायमूर्ती रानडे, केशवचंद्र सेन आणि म. जोतीराव फुले यांच्या विचारांचे त्यांनी सम्यक् असे परिशीलन केले आणि त्या आधारावर स्वत:चे धर्मविषयक विचार मांडले.

अठराव्या शतकात बंगाल प्रांत इंग्रजांच्या ताब्यात गेला. इंग्रजी शिक्षणास तेथे सर्वात आधी सुरुवात झाली. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस बंगालात नवी जागृती निर्माण झाली. त्यातून नवे विचार व नव्या चळवळी निर्माण झाल्या. त्यातील एक प्रवाह हेन्री डेरोझिओने सुरू केला. तो अँग्लो-इंडियन प्राध्यापक होता. दुसरा प्रवाह राजा राम मोहन रॉय यांनी सुरू केला. हेन्री डेरोझिओ (१८०९-१८३१) हा बुद्धिमान व बंडखोर विचारांचा होता. तो कवीही होता. त्याने त्याच्या लिखाणातून धर्म व विचारस्वातंत्र्याचा पुरस्कार केला. धर्मगुरू, धर्मसंस्था व मूर्तिपूजा यांचा धिक्कार केला. त्याने आपल्या तरुण विद्यार्थ्यांना सत्याचा शोध घेण्याचे आव्हान केले. पण त्याचे क्रांतिकारक विचार त्या काळातील सनातनी समाजास आवडले नाहीत. त्यामुळे त्याला आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला. तो वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी मरण पावला. त्याच्या कवितांमधून भारतीय राष्ट्रवादाचा पदरव आपणास ऐकू येतो.

राजा राम मोहन रॉय डेरोझिओपेक्षा जास्त खोल व व्यापक दृष्टीने विचार करीत होते. भारताच्या सामाजिक व राजकीय अध:पाताचा सल त्यांच्या मनात होता. त्यांना भारतास आधुनिक समाज बनवायचे होते पण भारताचे पुनरुज्जीवन

हे व ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केल्यामुळे किंवा डेरोझिओसारखे बंडखोर विचार मांडल्यामुळे होणार नाही. त्यासाठी भारतीय समाजाची आतून सुधारणा करणे गरजेचे आहे आणि सर्व सुधारणांची सुरुवात धर्मसुधारणेच्या द्वारा केली पाहिजे असे त्यांचे मत होते. रॉय यांनी सर्वांगिण सुधारणांचा पुरस्कार केला. या सुधारणांची चळवळ सुरू करण्यासाठी त्यांनी ब्राह्म समाजाची स्थापना केली. 'संवाद कौमुदी'सारखी वर्तमानपत्रे सुरू करून त्यांनी आपल्या मतांचा प्रचार व प्रसार केला. तौलनिक धर्मशास्त्र व युनिटेरियन विचारांचे ते पुरस्कर्ते होते. रॉय इंग्लंडमध्ये गेले त्या वेळी त्यांचे मोठे स्वागत झाले. जेरेमी बेंथॅम व रॉबर्ट ओवेनसारख्या विचारवंतांनी त्यांची भेट घेतली. आपल्या फ्रान्समधील एका भाषणात त्यांनी माणसामाणसांत कोणताही भेद नाही, सर्व माणसे एकाच परिवाराचे सदस्य आहेत आणि सर्व माणसांच्या विकासासाठी आणि उन्नतीसाठी माणसामाणसात बंधुभावाचे तत्त्व मान्य झाले पाहिजे असा विचार मांडला.

रॉय यांच्यावर उपनिषदांचा प्रभाव होता. त्यांनी उपनिषदांतील अद्वैत वेदान्ताचे तत्त्वज्ञान मान्य केले पण त्यासाठी त्यांनी शंकराचार्यांच्या भाष्याचा आधार घेतला नाही. त्यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला आणि मूर्तिपूजेस विरोध केला. रॉय यांचा ब्राह्म समाज एकमेकाद्वितीय ब्रह्माची उपासना करतो. त्यात विधी व कर्मकांड यांस महत्त्व नाही. ईश्वर अनंत, असीम, अमर्याद व नामरूप हीन असून तो सर्व ब्रह्मांडाचा निर्माता आहे. तो सर्व ज्ञानाचा व अस्तित्वाचा स्रोत आहे असे ब्राह्मसमाजाचे मत आहे. त्यांचा माणसाच्या आत्माच्या अमरत्वावर विश्वास होता. आफ्ला आत्मिक विकास केल्याशिवाय माणूस ईश्वराशी ऐक्य स्थापन करू शकणार नाही. म्हणून प्रत्येकाने समाजाचा एक घटक म्हणून नैतिकदृष्ट्या परिपूर्ण बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सद्‌गुण हेच माणसाच्या जीवनाचे प्रेरक तत्त्व असावे असे त्यांचे सांगणे होते.

मानवी जीवनात ईश्वराची उपासना महत्त्वाची आहे. पण ही उपासना एखाद्या क्रुद्ध दैवतास शांत करण्यासाठी वा ईश्वरास खूष करण्यासाठी करावयाची नसून प्रेम व सेवा हे उपासनेचे सारतत्त्व आहे. उपासना ईश्वर व माणूस यांच्यातील नैसर्गिक संबंधाचा आविष्कार आहे. ब्राह्म समाज मानवी आयुष्यास पाप मानत नाही. त्यांच्यामते ती ईश्वराची देणगी आहे. अवतारवादावर ब्राह्म समाजाचा विश्वास नाही. जगातील सर्व थोर धर्मसंस्थापक महामानव होते, ते स्वत: ईश्वर नव्हते. त्यांच्याबद्दल आपल्या मनात आदराची भावना असली पाहिजे. त्यांच्यामते जात, धर्म, वर्ण, राष्ट्र, भाषा ही कृत्रिम बंधने असून आपण ईश्वराचे पुत्र आहोत

व एकमेकांचे बंधू आहोत.

रॉय व ब्राह्मसमाज यांनी प्रेम व सेवा यांना महत्त्वाचे स्थान दिले. रॉय यांच्या मते खरे तर जनसेवा हीच ईश्वर सेवा आहे.

रॉय यांच्या मृत्यूनंतर ब्राह्म समाजाची धुरा देवेंद्रनाथ ठाकूर यांनी सांभाळली. त्यात प्रतापचंद्र मजूमदार, ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी भर घातली. केशवचंद्र सेन यांनी ब्राह्म समाजाचा विकास केला. त्यात त्यांनी अनेक सामाजिक सुधारणांचा समावेश केला. १८६६ साली समाजात फूट पडली. केशवचंद्रांनी भारतीय ब्राह्म समाजाची स्थापन केली. त्यांतूनही पुन्हा केशवचंद्रांचा नवविधान ब्राह्मसमाज व साधारण ब्राह्मसमाज निर्माण झाले. केशवचंद्रांच्या मृत्यूनंतर नवविधान ब्राह्मसमाजाचे महत्त्व कमी झाले. म. शिंदे यांनी साधारण ब्राह्म समाजाचे मिशनरी म्हणून काम केले. त्यांच्या विचारांवर राम मोहन रॉय आणि केशवचंद्र सेन यांच्या व्यक्तिमत्त्वाचा खोल असा परिणाम झाला.

प. भारतात धर्मसुधारणा चळवळीची सुरुवात १८४० पासून झाली. दादोबा पांडुरंग व त्यांच्या मित्रांनी परमहंस सभेची स्थापन केली. आपल्या 'धर्मविवेचन' या ग्रंथात दादोबांनी एकेश्वरवादाचा पुरुस्कार केला. राजा राम मोहन रॉय यांच्याप्रमाणेच त्यांनी ख्रिश्चन धर्मातील 'ट्रिनिटी'च्या कल्पनेस विरोध केला. दादोबा बुद्धीस व विवेकास महत्त्व देत. त्यांनी रॉय यांच्याप्रमाणे विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. सर्व धर्मसंस्थापकांना त्यांनी मान दिला. पण सर्व धर्मग्रंथ ईश्वरनिर्मित आहेत यावर त्यांचा विश्वास नव्हता. खरा धर्म नैतिक आचरणात व सत्याचा शोध घेण्यात सामावला आहे असे दादोबांचे मत होते.

केशवचंद्रांच्या मुंबई भेटीनंतर परमहंस सभेच्या काही सदस्यांनी १८६७ मध्ये डॉ. आत्माराम पांडुरंग यांच्या अध्यक्षतेखाली प्रार्थना समाजाची स्थापना केली. प्रार्थना समाजाने आपले अधिष्ठान भारतीय ठेवले. मराठी संत आणि भागवत धर्म यांचा आधार घेतला. प्रार्थना समाजाचे धर्मविषयक विचार डॉ. भांडारकर व न्या. रानडे यांनी मांडले.

न्या. रानडे एकेश्वरवादी होते. त्यांचा एकेश्वरवाद विश्वधर्मी होता. तो मानवाच्या हितासाठी आचरण करावयाचा मानव धर्म होता. त्यांना मूढ श्रद्धा, अज्ञयेवाद व साक्षात्कारित्वाचा अहंभाव मान्य नव्हता. उपनिषदात वर्णिलेले ईश्वराचे आनंदमय स्वरूप व विश्वात्मक ईश्वराची कल्पना त्यांना मान्य होती. त्यांच्यामते माणसाला स्वत्त्वाचे भान आहे आणि बुद्धीचे स्वातंत्र्य आहे. माणसाचा धर्म मानवतेची सेवा,

समता आणि माणुसकीची जोपासना करणे यात सामावला आहे. जीवनात आपणास जर उज्ज्वल आदर्श साध्य करावयाचे असतील तर समाजात न्याय आणि समता स्थापन होणे गरजेचे आहे. माणसाच्या प्रयत्नवादाचा त्यांनी पुरस्कार केला. प्रयत्नालाच ते कर्तव्यश्रेयसाधना व सार्थ जीवितयात्रा मानतात. त्यांच्यामते विश्व नीतिगर्भ असून मानव नैतिक प्रगतीच्या मार्गाने पुढे जाण्यात ईश्वरी संकेत आहे. रानडे यांचा ईश्वर विश्वाचे नैतिक नियमन करणारा परमेश्वर होता. तो जनता जनार्दन नव्हता. कारण जनार्दन म्हणून आपण गौरविला तरी जनता हा मानव समूहच राहतो. त्यास मानवी कक्षा व मर्यादा राहते. माणसाचे आयुष्य अनेक प्रयत्नांनी युक्त असून त्यात त्रास आहे पण आपण यशस्वी झाल्याचा आनंदही आहे. माणूस व ईश्वर यांत द्वैत आहे. कोणताही मनुष्य ईश्वर बनू शकत नाही. जीव-ब्रह्मऐक्याचा हिंदू तत्त्वज्ञानाचा सिद्धान्त आभासात्मक आणि काल्पनिक आहे.

रानडे यांनी ऐहिक जीवनात नैतिक कर्तव्यांना महत्त्वाचे स्थान दिले. त्यांनी असे स्पष्ट सांगितले की त्यांच्या धर्मसाधनेचा उद्देश गूढ मोक्षप्राप्ती करून घेणे हा नाही. तिचा उद्देश माणसाचा विकास करणे हा आहे. या मानवी विकासात त्यांनी नागरिकत्वाच्या गुणांचा विकास गृहीत धरला होता. म. शिंदे यांचा प्रार्थना समाजाशी जवळचा संबंध होता. रानडे यांच्या धर्मविषयक विचारांचा त्यांच्या मनावर खोल असा प्रभाव पडला.

ब्राह्म समाज व प्रार्थना समाजाबरोबरच म. जोतीराव फुले यांच्या सत्यशोधक समाजाने धर्मसुधारणेच्या चळवळीत मोलाची भूमिका बजावली. फुल्यांचा परमहंस सभेशी संबंध होता. सत्यशोधक समाजाचा विचार महाराष्ट्रातील ग्रामीण भागापर्यंत जाऊन पोहोचला. म. फुले यांनी वेद, उपनिषदे व मराठी भक्तिसंप्रदाय यांचा निषेध केला. त्यांनी सर्व धर्मांना सारखे महत्त्व दिले पण सर्वच धर्मात कमीजास्त प्रमाणात हेंगाडेपणा आहे म्हणून त्यांनी मानवी अधिकारांवर आधारलेल्या सार्वजनिक सत्यधर्माचा पुरस्कार केला. त्यांच्या मते विश्वाचा निर्माणकर्ता निर्मिक असून तो निराकार आहे. त्याची प्रार्थना आपण स्वतंत्रपणे करावी. ईश्वर व मनुष्य यांत मध्यस्थ नको. म. फुले मानवी अधिकारांचे पुरस्कते होते. ते प्रखर नैतिकतेचे व माणसामाणसांतील समानतेचे पुरस्कर्ते होते. त्यांनी धर्मवाद, ब्रह्मवाद व इतर आध्यात्मिक तत्त्वविचारांत फारसा रस घेतला नाही. मानवी जीवनातील शोषण व अन्याय दूर करणे त्यांना महत्त्वाचे वाटत होते. सत्याचा शोध घेणे महत्त्वाचे आहे पण सत्य माणसाच्या नैतिक आचरणारतून अभिव्यक्त होते असे त्यांचे मत होते.

भारतात नागरी समाज निर्माण करण्यासाठी नागरिकांचे मानवी हक्क अमलात आणणे महत्त्वाचे आहे असे म. फुले सांगत. जोतीरावांच्या विचारांचा प्रभाव म. वि. रा. शिंदे यांच्या विचारांवर पडला.

आधुनिक भारतीय धर्ममीमांसेची आपण थोडक्यात चर्चा केली. भारतीय संदर्भात ही धर्ममीमांसा महत्त्वाची होती. राजा राम मोहन रॉय यांचा प्रयत्न युनिटेरियन पंथाच्या चळवळीची तत्त्वे आत्मसात करण्याचा होता. भारतात धर्ममीमांसेचे दोन संप्रदाय होते. पहिला संप्रदाय वेदान्त तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करीत होता पण तो वेदप्रामाण्यवादी नव्हता. त्याची जगाकडे पाहण्याची दृष्टी ही अन्वय दृष्टी होती. त्यांत एकेश्वरवाद, विचारस्वातंत्र्य, प्रेम व सेवा यांना प्राधान्य होते. दुसरा दृष्टिकोण अद्वैत वेदान्ताचा होता. या दृष्टिकोणाचे समर्थन करणारे विचारवंत शंकराचार्यांच्या भाष्यास वाट पुसत जाणारे, भारतीय परंपरेतच आपला जीवनरस शोधणारे होते. वेद, उपनिषद व गीता त्यांना महत्त्वाचे वाटत म्हणून त्यांनी गीतेवर भाष्ये लिहिली. या विचारवंतांमध्ये रामकृष्ण, विवेकानंद, अरविंद घोष, लोकमान्य टिळक आणि म. गांधी यांचा समावेश होतो. त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण व्यतिरेक दृष्टिकोण होता. त्यांचा द्वैतास पाठिंबा नव्हता व त्यांना वेदप्रामाण्य मान्य होते. मात्र वेदांचा अर्थ लावण्याचा अधिकार ते स्वत:कडे ठेवीत होते. २०व्या शतकातील भारतातील तत्त्वसंघर्ष या दोन विचारप्रवाहांत झाला. अन्वय पद्धतीचा पुरस्कार करणारे विचारवंत ब्रह्म सत्य आहे आणि त्याबरोबरच जगही वास्तव आहे असे मानीत होते. तर व्यतिरेक पद्धतीचा पुरस्कार करणारे विचारवंत ब्रह्म सत्य आहे आणि जग मिथ्या आहे असा विचार मांडीत होते. अन्वय पद्धतीचा भर विश्व व मानव यांच्या संबंधावर होता तर व्यतिरेकी पद्धती जीव व ब्रह्म यांच्या ऐक्यावर जास्त भर देत होती व ती ब्रह्मकेंद्रित होती.

म. वि. रा. शिंदे या दोन विचारप्रवाहांमधील अन्वय पद्धतीचे पुरस्कर्ते होते. त्यांनी जीवनभर धर्मसुधारणेचा पुरस्कार केला. त्याचबरोबर सर्व धर्मांतील सारतत्त्वांचा शोध घेऊन विश्वधर्माचा पुरस्कार करणाऱ्या युनिटेरियन पंथाची तत्त्वे अंगी बाणवली. या धर्मतत्त्वांचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य केले.

❑❑❑

प्रकरण दुसरे

# म. वि. रा. शिंदे यांचे धर्मविषयक कार्य

म. वि. रा. शिंदे यांनी मिशनरी म्हणून व मिशनरी वृत्तीने धर्मप्रसाराचे कार्य केले. मानवी जीवनात धर्म महत्त्वाची भूमिका बजावतो असे त्यांचे मत होते. त्यांचा जन्म वारकरी कुटुंबात झाला. मराठी संत वाङ्मयावर त्यांचा पिंड पोसला होता. लहानपणीच त्यांच्या मनात जी धर्मविषयक ज्योत जागृत झाली ती आयुष्यभर त्यांच्या मनात तेवत राहिली. भागवत धर्माच्या व बौद्ध धर्माच्या ऐतिहासिक कार्याचा आढावा घेत असताना त्यांनी धर्माच्या परिणत स्वरूपाचे दर्शन घडविले. धर्मामागील माणसाच्या नैतिक विकासाची आणि मुक्तीची प्रेरणा त्यांनी लक्षात घेतली होती. घरात भागवत धर्माचे संस्कार होतेच पुढे ते पुण्यास उच्च शिक्षणासाठी आले. त्या काळात आगरकरांच्या अज्ञेयवादी विचारांचा दबदबा असतानाही ते त्यांचे पाईक झाले नाहीत. आगरकरांच्या 'सुधारका'चे ते नेमाने वाचन करीत असत. काही काळ त्यांच्या मनावर अज्ञेयवादाचा प्रभाव होता. पण १८९७-९८ मध्ये ते प्रा. भांडारकर व न्या. रानडे यांच्या प्रभावाखाली आले. त्यानंतर त्यांच्या मनावर प्रार्थना समाजाच्या धर्मविचारांचा प्रभाव पडावयास सुरुवात झाली.

पुढे लौकरच म. शिंदे यांची ब्राह्म समाजातर्फे इंग्लंडमध्ये तुलनात्मक धर्मशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी निवड झाली व त्यासाठी ते इंग्लंडला रवाना झाले. आगबोटीने प्रवास करताना त्यांच्या मनात सात्त्विक धर्मभावना उसळत होत्या. समुद्राकडे पाहून ते लिहितात, "सागर महामुनी शांत व गंभीर रूप धारण करून 'एकमेकाद्वितीयम्' या मंत्राचा आपल्याशीच पाठ करीत संध्यावंदन करीत बसलेले दिसले." या बाबत धर्माच्या सामाजिक व राजकीय जीवनातील कार्याबाबतही ते विचार करीत होते. धर्माकडे व धर्मसुधारणेकडे दुर्लक्ष करणे त्यांच्या मते अयोग्य आहे. ते सुधारकांना बजावतात, "शेवटी धर्माच्या बाबतीत उदासीन राहणाऱ्या नास्तिक व अज्ञेयवादी सुधारकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की धर्माच्या

नावाने जी ही थोतांडे वेळोवेळी उपस्थित होतात व वाढत जातात. ती केवळ थट्टा व निंदा केल्याने नष्ट होत नाहीत. उलट लोकमताचे या थोतांडास पूर्ण पाठबळ असल्याने या रिकामटेकड्या सुधारकांचीच थट्टा होते. शिवाय ही थोतांडे नाहीशी झाली तरी मोठासा कार्यभाग झाला असे नाही. शुद्ध धर्माची ज्योत राष्ट्रात सतत जळत राहिल्यासच राष्ट्राच्या अनेक चळवळीस जोम येईल आणि यास्तव प्रत्येक देशभक्ताने धर्मसुधारणेचे काम हस्तेपरहस्ते करणे जरूर आहे.''

तौलनिक धर्माचा त्यांनी मँचेस्टर येथे अभ्यास केला. त्यांच्या मते धर्म ही बाब मुळात पढीक शिक्षणाची नव्हे. तेथे परमेश्वर हाच गुरू, विश्व हीच शाळा व सृष्टी हेच पुस्तक. मैचेस्टर येथील तौलनिक धर्मशास्त्राचा अभ्यास शिकविण्याऱ्या महाविद्यालयात स्वातंत्र्य व मोकळेपणा होता; निर्भयता होती. तेथील वातावरण त्यांना आवडले. उदार धर्माच्या तत्त्वांचा त्यांनी मनोमन स्वीकार केला. त्यांच्या हे लक्षात आले की धर्मसाधना म्हणजे केवळ ईशचिंतन आणि प्रार्थना नव्हे. धर्मसाधना म्हणजे इहलोकी समाजाची सेवा करणे आहे.

म. शिंद्यांनी कार्पेंटरच्या मतांचा आधार घेत उदार धर्माच्या खालील तत्त्वांची मांडणी केली :

१. विज्ञान, धर्म आणि तत्त्वज्ञान यांनी सत्याचा केलेला शोध उचित असून अशा शोधांस अवसर दिला पाहिजे.

२. ईश्वर हे चैतन्य आहे, हे सर्व धर्मांचे मूलतत्त्व असून ईश्वराची उपासना म्हणजे चैतन्याची व सत्याची उपासना आहे. ही उपासना ईश्वर आणि जीवात्मा यांच्यात निकट संबंध प्रस्थापित करते.

३. उदार धर्म कोणताही धर्मग्रंथ वा धर्मगुरू एकमेव प्रमाण मानीत नाही. तो सर्वांनाच ईश्वराकडे जाण्याचा मार्ग खुला करतो.

४. उदार धर्म धर्मांतराचा पुरस्कार करीत नाही.

५. जीव, जगत् व ईश्वर यांच्यात संवाद स्थापन करणे हे उदार धर्माचे उद्दिष्ट आहे.

६. उदार धर्म माणसाच्या दुर्जनत्वाच्या सिद्धान्तावर विश्वास ठेवीत नाही. त्याच्या मते नैतिक वर्तनाचे आदेश स्वर्गातून येत नाहीत, किंवा ते एखाद्या प्रेषितांकडूनही दिले जात नाहीत. ते मुख्यत: सामाजिक संस्थांच्या व मानवजातीच्या वर्तनातून अभिव्यक्त होतात. उदार धर्माची ईश्वरावर जगाचा कर्ता व धारक म्हणून गाढ श्रद्धा आहे.

मँचेस्टरचे कॉलेज उदार धर्माच्या युनिटेरियन पंथाकडून चालविले जात होते. सत्य धर्म व स्वातंत्र्य यांचा ते पुरस्कार करीत होते. व्यक्तीने सत्याचा व धर्माचा शोध घेण्यासाठी आपल्या क्षमतांचा विकास करावा असे त्या कॉलेजमधील प्राध्यापकांचे सांगणे होते. लिव्हरपूल येथे १९०३ साली युनिटेरियम पंथाच्या सभासदांची आठवी परिषद भरली होती. या परिषदेत म. शिंदे यांनी भाग घेतला. लोकमताच्या जडणघडणीत वेगवेगळ्या संस्था व त्यांच्या वार्षिक व अर्धवार्षिक परिषदा किती महत्त्वाचे काम करतात हे त्या वेळी शिंदे यांच्या लक्षात आले. त्याचप्रमाणे धर्मप्रचाराच्या चळवळीत संघटनात्मक कार्य चोखपणे करणे किती महत्त्वाचे आहे हेही त्यांच्या लक्षात आले. युनिटेरियन पंथाचे दुसरे आंतरराष्ट्रीय संमेलन अमॅस्टरडॅम येथे भरले. या परिषदेत म. शिंदे यांनी 'भारतातील उदार धर्म' या विषयावर निबंध वाचला. या निबंधात त्यांनी ब्राह्म समाज, आर्यसमाज व थियॉसॉफिकल सोसायटी या तीन उदार धर्मवादी चळवळींची माहिती दिली. या तिन्ही चळवळीत ब्राह्म समाजात उदार धर्माचे पूर्ण प्रतिबिंब पडलेले आपणास दिसते असे मत त्यांनी व्यक्त केले.

भारतात परत आल्यावर म. शिंदे यांनी प्रार्थना समाजाचे मिशनरी म्हणून प्रार्थना समाजाच्या कार्यास सुरुवात केली. त्याच बरोबर त्यांनी All India Theistic Conference च्या कामालाही सुरुवात केली. १९०४-१९१४ या काळात या संस्थेच्या कार्यास त्यांनी आपणास वाहून घेतले. या एकेश्वरवादी परिषदेची सुरुवात १८८८ मध्ये न्या. रानडे यांनी केली. तिचे अधिवेशन काँग्रेसच्या अधिवेशनाबरोबर होत असे. त्यानिमित्ताने देशभरातील धर्मसुधारणेचे काम करणारे कार्यकर्ते एकत्र जमत असत. पण नंतर या परिषदा भरणे बंद झाले होते. १९०३ पासून या परिषदा पुन : भरविण्यास म. शिंदे यांनी सुरुवात केली. राष्ट्रीय स्तरावर भारतात उदार धर्माची चळवळ सुरू करण्याचा शिंदे प्रयत्न करीत होते. भारतातील या चळवळीतील सर्व नेत्यांशी व कार्यकर्त्यांशी वैयक्तिक संबंध स्थापन करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यात वीरशैवलिंग पंतलू, प्रतापचंद्र मजूमदार, शिवनाथशास्त्री इत्यादींशी त्यांचे संबंध प्रस्थापित झाले. १९०४ साली या एकेश्वरवादी परिषदेचे अधिवेशन मुंबई येथे भरले होते. त्यानंतर सलग १० वर्षे त्यांनी या परिषदेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. या काळात त्यांनी या परिषदेची घटना तयार केली. म. शिंदे यांच्या प्रयत्नाने वाराणसी, कलकत्ता, सूरत, मद्रास व लाहोर येथे या परिषदेची अधिवेशने भरली होती. देशात वेगवेगळ्या भागात कार्यरत असणाऱ्या उदार धर्माच्या समर्थकांना एका छात्राखाली आणण्याचा म. शिंदे यांचा प्रयत्न होता. या परिषदेच्या वतीने शिंदे यांनी थिईस्टिक डिरेक्टरी तयार केली. या

डिरेक्टरीच्या पहिल्या भागात भारतात राष्ट्रीय, प्रांतिक व आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या उदारधर्मवादी संस्थांची माहिती दिली आहे. १९१२ साली ही डिरेक्टरी प्रकाशित झाली. 'थिइस्टिक परिषदे'चे आंतरराष्ट्रीय अधिवेशन घेण्याची त्यांची योजना होती. पण १९१४ साली पहिल्या महायुद्धास तोंड फुटले आणि अशा प्रकारची व्यापक परिषद घेण्याचे म. शिंदे यांचे प्रयत्न अयशस्वी ठरले.

उदार धर्माचा प्रचार व प्रसार करणाऱ्या या चळवळीस राजकीय मतभेदामुळे ग्रहण लागले. कारण भारतीयांच्या न्याय्य राजकीय मागण्यांना इंग्रज सरकार वाटाण्याच्या अक्षता लावीत होते. पण त्याकडे इंग्लंडमधील उदार धर्माचे पुरस्कर्ते सहानुभूतीने पाहत नाहीत, याबद्दल उदार धर्म मानणारे लोक नाराज होते. स्वत: शिंदे प्रखर राष्ट्रवादी होते. पण उदार धर्माच्या व्यासपीठावर राजकारणाची चर्चा करावयाची नाही असे ठरले.

म. शिंदे यांनी एकेश्वरवादाचा संघटनात्मक विकास केला. एकेश्वरवाद्यांना अखिल भारतीय व्यासपीठ मिळवून दिले. राममोहन, केशवचंद्र, देवेंद्र नाथ, प्रतापचंद्र मजूमदार यांचे कार्य पुढे नेले. त्यांच्यामुळे चळवळीचे केंद्र कलकत्त्याहून मुंबईकडे सरकले. एकमेकांना पाण्यात पाहणाऱ्या ब्राह्म समाजाच्या फुटीर गटांनादेखील त्यांनी एकत्र केले. थिइस्टिक कॉन्फरंसच्या कार्यकर्त्यांना त्यांनी सामाजिक कार्य करण्यास उद्युक्त केले. त्यात उत्तर प्रदेशातील दुष्काळग्रस्तांना मदत आणि लग्नविषयक कायद्यांत सुधारणा करण्यासाठी आंदोलन यांचा समावेश होतो.

म. शिंदे यांनी पूर्वेकडील व पश्चिमेकडील उदार धर्मीयांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी प्रार्थना समाज व ब्रिटिश युनिटेरियन्स यांच्यात जवळचे संबंध प्रस्थापित केले. श्री. सुंडरलँड यांच्याकडे आग्रह धरून भारतीय मिशनऱ्यांसाठी मँचेस्टर कॉलेजात काही शिष्यवृत्त्या ठेवल्या. अमेरिकेतही अशा प्रकारच्या शिष्यवृत्त्या ठेवण्यात आल्या. त्यांनी प्रार्थना समाजातर्फे पोस्टल मिशन आणि उदार धर्माचे साहित्य वाचण्यासाठी वाचकवर्ग संघटित केले. भारतातील उदार धर्माच्या चळवळीला त्यांनी लोकाभिमुख केले. उदार धर्माचे रहस्य समजून घेण्यास या चळवळीची त्यांना मोठी मदत झाली.

प्रार्थना समाजाने उदार धर्माचा व एकेश्वरवादाचा पुरस्कार केला होता. हा समाज परमहंस सभेच्या वैचारिक मुशीतून तयार झाला होता. पण रानडे व भांडारकर यांच्या नेतृत्वाखाली समाजाने नेमस्तपणाचे धोरण स्वीकारले. सुधारणेच्या बाबतीत तो ब्राह्म समाजाइतकाही आक्रमक नव्हता. रानड्यांनी सर्वांगीण सुधारणांचा आग्रह धरला. पण थोर संस्थापक काळाच्या पडद्याआड गेल्यानंतर हा समाज

काहीसा पोरका झाला होता. १९०१ साली या समाजात मिशनरी म्हणून म. शिंदे रुजू झाले. हे काम कसे करायचे याचे त्यांना मँचेस्टर कॉलेजात प्रशिक्षण मिळालेले होते. त्यामुळे त्यांनी समाजाचे काम मोठ्या प्रमाणात वाढविले. प्रार्थना समाजाचे विचार वेगवेगळ्या थरांतील लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी त्यांनी धार्मिक वाचनवर्ग, पोस्टल मिशन, प्रार्थना करण्यासाठी सुलभ संगीत पुस्तिका इत्यादी उपक्रम सुरू केले. प्रार्थनेपूर्वी बंगाली, मराठी व हिंदी भक्तिगीते गाण्याची पद्धत त्यांनी सुरू केली. शिंद्यांचे हे कार्य तरुण विद्यार्थांत लोकप्रिय ठरले. आपल्या या कार्यकाळात शिंदे यांनी ब्राह्म समाजाची एकूण ३,४३८ पुस्तके, १२,७०० लेख आणि युनिटेरियन समाजाची ६३९ पुस्तके व ५००० पुस्तके समाजातील वेगवेगळ्या वर्गांत वितरित केली. कारण शिंदे यांच्या दृष्टीने ब्राह्म समाज आणि प्रार्थना समाज यांच्या कार्यात वैचारिक सामंजस्य होते.

उदार धर्माची चळवळ केवळ धार्मिक सुधारणांचाच पुरस्कार करणारी चळवळ नव्हती. तिने सामाजिक सुधारणेच्या कार्यात सहभागी व्हावे असे शिंदे यांचे मत होते. म्हणून त्यांनी १९०६ साली 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन'ची स्थापना करून अस्पृश्यता निर्मूलनाच्या महत्त्वाच्या कार्यास सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी तन, मन व धन अर्पण केले. काही कारणांमुळे त्यांना १९२३-२४ साली या संस्थेतून बाहेरही पडावे लागले!

त्यानंतर म. शिंदे यांनी ब्राह्म समाजाचे मिशनरी म्हणून काम करावयास सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी दक्षिण भारत हे आपले कार्यक्षेत्र निवडले. त्यांनी त्याकरिता मंगलोरला प्रयाण केले आणि तेथेही मोठ्या जिद्दीने धर्मप्रसाराचे काम सुरू केले. त्या काळात त्रावणकोर प्रांतात वायकोम येथे मंदिर प्रवेशासाठी दलितांनी मोठा सत्याग्रह केला. या सत्याग्रहात म. शिंदे सामील झाले. ब्राह्म समाजाच्या धुरिणांना म. शिंदे यांचे हे कृत्य आवडले नाही. त्यामुळे मंगलोर ब्राह्म समाजात मोठा वाद झाला. त्याचे पर्यवसान म. शिंदे यांनी आपले काम सोडण्यात झाले. त्यानंतर त्यांनी राष्ट्रीय चळवळ, शेतकरी व इतर अनेक चळवळींत भाग घेतला. महाराष्ट्रातील बहुजन समाजास राष्ट्रीय चळवळीत आणण्याचे अत्यंत अनन्यसाधारण असे कार्य शिंद्यांनी केले.

म. शिंदे यांनी धर्मसुधारणेच्या क्षेत्रात मोलाचे कार्य केले. या क्षेत्रात त्यांचा अधिकार व प्रतिष्ठा एवढी मोठी होती की कलकत्त्याला १९२८ साली ज्या वेळी ब्राह्म समाजाचा शताब्दी समारंभ झाला त्या वेळी म. शिंदे यांना एक प्रमुख पाहुणे म्हणून बोलावण्यात आले. म. शिंदेदेखील आपल्या हातातील सर्व कामे सोडून

या कार्यक्रमास हजर राहिले.

ब्राह्म समाज, प्रार्थना समाज व सत्यशोधक समाज यांच्याबद्दल त्यांच्या मनात ममत्व होते. त्यांच्या कार्याची अत्यंत सम्यक अशी मीमांसा त्यांनी केली.

❑❑❑

प्रकरण तिसरे

# म. वि. रा. शिंदे यांची आधुनिक भारतातील धर्मसुधारणा चळवळींची मीमांसा

आधुनिक भारतातील धर्मसुधारणा चळवळींशी म. शिंदे यांचा जवळचा संबंध होता. प्रार्थना समाज व ब्राह्म समाज यांचे तर ते मिशनरी होते. सत्यशोधक समाजाबाबतही त्यांच्या मनात ममत्व होते. धर्मामध्ये सेवा व अंत:साधना ही तत्त्वे प्रधान असून त्यांचा आविष्कार राममोहन, केशवचंद्र आणि जोतीराव फुले यांच्या जीवनकार्यात झालेला आपणास दिसतो असे त्यांचे मत होते. भारतीय उदार धर्माचा पुरस्कार करणाऱ्या या सर्व चळवळींची त्यांच्या गुणदोषांसह म. शिंदे यांनी सम्यक् अशी मीमांसा केली.

ब्राह्म समाज व ब्राह्म समाजाचे संस्थापक राममोहन रॉय यांच्याबद्दल म. शिंदे यांना अपार आदर होता. कारण त्यांच्या मते राममोहन आधुनिक भारताचा जनक होता. त्याचा विचार सर्वांगीण सुधारणांचा पुरस्कार करणारा होता. त्याच्या विचारात पूर्व व पश्चिम, प्राचीन व अर्वाचीन विचारांचा योग्य असा मिलाफ दिसून येतो. तो अशोक व अकबर यांच्या बरोबरीचा होता. सत्य, न्याय, सहिष्णुता यांचा त्याने पुरस्कार केला. त्याने भक्ती, ज्ञान व कर्म हे जीवनातील सर्व भाग व्यापून टाकणारा सार्वत्रिक धर्म मनात आणला. आर्थिक सुधारणा, सामाजिक सुधारणा व राजकीय सुधारणा परस्परांवर आधारलेल्या आहेत, असे तो मानीत असे.

त्यांच्याबद्दल म. शिंदे लिहितात, "त्याचा धर्म म्हणजे केवळ एकमत वा मनोवृत्तीच नसे. त्याचे जीवनही सर्व बाजूचे असे." राजकारण व आर्थिक अभ्युदय, धर्मसुधारणा व समाजसुधारणा यासाठी त्यांनी प्रयत्न केले. देशाभिमान हे त्याच्या सर्वात्मक वृत्तीचे अंग होते. त्यांनी राजा व प्रजा यांच्यात मध्यस्थ म्हणून काम केले. राम मोहन रॉय यांच्या कार्याची दोन अंगे होती. पहिले अंग धर्मसमन्वयाचे

आणि दुसरे अंग भारतीय समाजाची पुनर्घटना करण्याचे. ब्राह्म समाजाने रॉय यांची उद्दिष्टे प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला.

ब्राह्म समाजाने भारतीय समाजात मोकळेपणा व स्वातंत्र्य यांचा पुरस्कार केला. म्हणून म. शिंदे यांच्या मते ब्राह्म धर्माचे पहिले तत्त्व म्हणजे मोकळा विश्वास हे आहे. ब्राह्म समाज वाढत्या ज्ञानाचे, नित्यनूतन नव्या ज्ञानाचे स्वागत करतो. कारण हे ज्ञान व्यक्तीचे अनुभव व माणसास लागलेले शोध यांवर आधारलेले आहे. ब्राह्म समाजाचे तिसरे तत्त्व शुद्ध प्रीती हे आहे. ही प्रीती लाभावीण असली पाहिजे. चौथे तत्त्व सात्त्विक सेवा हे आहे. यात प्रेमाने केलेल्या सेवेचा उल्लेख आहे. ब्राह्म विचारांचा प्रसार व प्रचार करण्यासाठी गावोगावी ब्राह्म समाजाच्या शाखा स्थापन झाल्या पाहिजेत असे म. शिंदे यांचे मत होते. सनातनता, सयुक्तिकता, आध्यात्मिकता व व्यावहारिकता ही ब्राह्म धर्माची वैशिष्ट्ये होती. सनातनता म्हणजे सर्व धर्मात व सर्व धर्मग्रंथात सनातन धर्माची जी उच्च अशी तत्त्वे आहेत ती तत्त्वे ईश्वराने मानवजातीला दिलेली सामाजिक देणगी आहे असे समजून वागणे. सयुक्तिकता म्हणजे सर्व धर्मातील विचारांची चिकित्सा विवेकबुद्धीने करून त्यांतील जे सयुक्तिक विचार आहेत त्यांचा स्वीकार करणे व ज्या कालबाह्य गोष्टी आहेत त्यांचा त्याग करणे. आध्यात्मिकता म्हणजे सर्व विश्वाच्या मूल स्थानी असणाऱ्या चैतन्याच्या अस्तित्वावर विश्वास आणि भक्तीच्या मार्गाने त्याचा ठाव घेण्याचा प्रयत्न होय. ब्राह्म धर्म हा सेवा धर्म आहे. भारताचा अभ्युदय होण्यासाठी सामाजिक सुधारणा आवश्यक आहेत. म्हणून ब्राह्मांच्या मते व्यावहारिकता म्हणजे आपल्या विचारांचे प्रत्यक्ष व्यवहारामध्ये आचरण करणे होय. ब्राह्म समाज आपल्या मूळ तत्त्वांशी अकारण तडजोड करीत नाही. उज्ज्वल सत्य व देशाचे उच्चतर हित यासाठी ब्रह्मधर्म मूर्तिपूजा, अनेक दैवतवाद, कर्मकांड यांच्याशी तडजोड करीत नाही पण त्याचबरोबर ब्राह्म समाज विचाराने हटवादी नाही. त्यांचा स्वमताबद्दल ठाम आग्रह असला तरी ते आपले विचार जुलमाने लोकांवर लादण्याच्या विरोधात आहेत. कारण विज्ञान व धर्मशास्त्राचा अतिशयित पुरस्कार करणारे धर्म मार्गात अडथळे निर्माण करतात, याची त्यांना जाणीव आहे. ब्राह्म समाजाची दारे समाजातील सर्व लोकांसाठी खुली आहेत.

राम मोहन रॉय यांच्यानंतर ब्राह्म समाजात बदल घडवून आणण्याचे कार्य केशवचंद्र सेन यांनी केले. राम मोहन यांनी विचारांची बाजू सांभाळली तर केशवचंद्रांनी संघटनेची बाजू सांभाळली. केशवचंद्रांनी ब्राह्म समाजाच्या शाखांची संख्या १२ वरून १२४ पर्यंत नेली. धार्मिक सुधारणेस प्रत्यक्ष समाजसुधारणेचे

स्वरूप दिले. त्यांनी आबालवृद्धांना, स्त्री-पुरुषांना ब्राह्म समाजात आणले. ब्राह्म समाज ही स्वातंत्र्यजनक संस्था आहे. तिच्यात धर्मग्रंथ, गुरू, जातिभेद व पुरोहित यांचे बंड नाही. इहलोकी आपला संसार जागृतपणाने व प्रेमाने करावा असे ब्राह्म धर्म सांगतो. त्यामुळे एखादा प्रामाणिक सुतार, हुशार न्हावी व प्रेमळ भंगी पोटभरू पुरोहितांपेक्षा शंभर पटीने जास्त धार्मिक आहे असे त्याचे सांगणे होते.

आर्यसमाज ही उदार धर्माची दुसरी शाखा. स्वामी दयानंदांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला व मूर्तिपूजा, स्त्रीदास्य व वर्णवर्चस्व यांस विरोध केला. आर्यसमाजाचे धर्मकारण व समाजकारण आक्रमक व धडाडीचे होते. आर्यसमाजास माणसांचे बंधुत्व व मानवी हक्क मान्य आहेत. धर्मातील विभूतीप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य, मठप्रामाण्य व रूढीप्रामाण्य ही प्रामाण्ये ब्राह्म समाजास मान्य नाहीत. पण आर्यसृमाजास ग्रंथप्रामाण्य मान्य आहे. ब्राह्म समाजास सर्वच ग्रंथ पूजनीय वाटतात. त्यांचा भर बाह्यप्रामाण्यापेक्षा अंत:प्रामाण्यावर जास्त आहे. त्यांस ईश्वर प्रमाणभूत आहे व त्याचे प्रामाण्य त्यांस अंतर्यामातून व विवेकबुद्धीतून प्राप्त होते. त्याबाबत म. शिंदे लिहितात, "ईश्वरी सत्य जे आहे ते सनातनच आहे. पण त्याचा वेळोवेळी जो मानवी शब्दांनी स्फोट होतो तो देशकालांनी परिच्छिन्न असतो. म्हणून शब्दाविषयी आग्रह न धरता सत्याविषयी आग्रह धरणे हे प्रामाण्यबुद्धीचे लक्षण आहे." मात्र आर्यसमाजाचा आग्रह वेदप्रामाण्याचा आहे. ब्राह्म समाजाने श्रुती टाकलेल्या नाहीत. त्यांना वेदांचा भाग असलेली उपनिषदे मान्यच आहेत. गीता आणि भक्तिसंप्रदायही त्यांना मान्य आहे. त्यामुळे त्यांच्या मते आर्यसमाजाचा याबाबतचा आग्रह योग्य नाही.

ब्राह्म समाजातून प्रार्थना समाजाची निर्मिती झाली. या समाजाचा म. शिंद्यांशी निकटच संबंध होता. व्यक्तीला आध्यात्मिक उन्नतीचा स्वानुभव करून देणे, भक्ती, ज्ञान, कर्म व वैराग्य यांचा अर्थ समजावून घेणे महत्त्वाचे असते. प्रार्थना समाजाच्या कार्यक्रमात भक्तीला महत्त्व होते. भक्तीमुळे मनाची अंतर्बाह्य शुद्धी होती व त्यास प्रसन्नता लाभते असे समाजाचे मत होते. पण प्रार्थना समाज पुरेसा लोकाभिमुख नाही म्हणून त्यांनी त्यांवर टीका केली. प्रार्थना समाजाची भाषा मराठी नसून इंग्रजी आहे व त्यात महार, मांग, भंगी, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी व नास्तिक यांचाही समावेश झाला पाहिजे. नाहीतर प्रार्थना समाजाचा पाया पोकळ पांडित्यावर आधारलेला आहे आणि त्यात बहुजन समाजाचा शिरकाव नाही, हा आक्षेप मान्य करणे भाग पडेल. समाजातील सर्व थरांत स्वातंत्र्य, शुद्धी आणि मैत्री या भावनांचा परिपोष व्हावयाचा असेल तर प्रार्थना समाजाने जास्त

लोकाभिमुख होणे गरजेचे आहे. समाजसेवा हा धर्मकारणाचाच भाग आहे. दुष्काळग्रस्त लोकांना मदत करणे; अशिक्षितांसाठी शाळा काढणे; अस्वच्छ लोकांना गरम पाण्याने स्नान घालणे; सर्वसाधारण सामाजिक जुलमाखाली चिरडल्या गेलेल्या लोकांची शुश्रूषा करणे म्हणजेच सामाजिक सेवा होय.

म. शिंदे जरी ब्राह्म समाजाचे व प्रार्थना समाजाचे मिशनरी होते तरी म. जोतीराव फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या विचारांचे मर्म त्यांनी फार चांगल्या प्रकारे ओळखले होते. रानडे, दादोबा व भांडारकर यांच्याबरोबरच महाराष्ट्रात धर्मसुधारणेचा दिवा जोतीबांनी लावला. आपले नाव व आडनाव सार्थ केले. वाई येथील ब्राह्म समाजात एका ढोर गृहस्थाने उपासना चालवली, हा जोतीबांचा जयजयकार आहे असे त्यांचे मत होते. आपल्या जोतीबांवरील पोवाड्यात त्यांनी जोतीबास सत्याचा व पतिताचा पालक, कर्माची खडी तलवार आणि जनतेचा शेर म्हणून गौरवले आहे. राम मोहन जर नवभारताचा जनक होता तर जोतीबा हा नवमहाराष्ट्राचा जनक आहे. त्यांच्या मते सत्यशोधक समाज हा सुंदर हार्मोनियम आहे. त्यावर व्यवस्थित बोटं ठेवली तर सुंदर व मधुर आवाज निघेल. जोतीबांचे ‘सार्वजनिक सत्यधर्म’ हे पुस्तक सत्यशोधकांचे बायबल आहे. त्यामुळे सत्यशोधकांनी समानतेच्या पायावर सत्यप्रीतीने काम करावे असे त्यांचे सांगणे होते.

म. शिंद्यांनी आपल्या एका लेखात म. फुले व केशवचंद्र सेन यांची तुलना केली आहे. त्यांच्या मते दोघेही जन्माने ब्राह्मणेतर होते व ते जरी ब्राह्मण म्हणून जन्मले असते तरी त्यांनी हेच काम केले असते. ते दोघेही अन्यायी भ्रष्ट हिंदू धर्म व हिंदू वरिष्ठ वर्गाविरुद्ध चिडलेले बंडखोर होते; पण त्यांनी धर्मांतर केले नाही. धर्मातच राहून सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. कारण दोघेही ख्रिश्चन मिशनरी व सरकार यांचे कावे ओळखून होते. दोघेही स्त्री-शूद्रांचे कर्ते, यशस्वी व कनवाळू कैवारी होते. त्यांनी सामाजिक आणि धार्मिक सुधारणांचा भरभक्कम पाया घातला म्हणूनच नंतरच्या लोकांना देशहिताच्या विविध चळवळी उभ्या करता आल्या. दोघेही दयाळू, उदार, सरळ, सडेतोड, क्षमाशील आणि निष्कपटी होते. त्याचबरोबर ते दोघेही हुल्लडखोर, अतिकांक्षी व निष्कारण वैर निर्माण करणारे होते. त्या दोघांनाही त्यांच्या सात्त्विक महत्त्वाकांक्षेमुळे प्रतिपक्षाचा व स्वकीयांचा तीव्र छळ सोसावा लागला. पण दोघेही मरपेर्यंत निकराने लढले म्हणून ते अपूर्व धर्मवीर होते!

त्यानंतर म. शिंदे यांनी दोघांतील भेदांची चर्चा केली आहे. केशव गर्भश्रीमंत

खानदानी घरात जन्मला तर जोतीबा गरीब माळी जातीत जन्मला. केशव सुशिक्षित होता तर जोतीबा बहुश्रुत. लक्ष्मी व सरस्वतीचे वरदान हा केशवच्या पायात अडथळा होता. जोतीबाच्या पायात तो नव्हता हे त्याचे भाग्य! त्यांच्या सामाजिक पार्श्वभूमीतील वेगळेपणामुळे त्यांचे कार्य भिन्न राहिले. केशवचे कार्य त्रैवर्णिकांपुरते मर्यादित होते तर जोतीबांचे कार्य मुख्यत: 'शूद्रादी अतिशूद्रात' झाले. त्यामुळे दोघांचेही कार्य एकदेशीय झाले. केशवने ब्राह्म धर्माचा झेंडा जगभर फिरवला मात्र जोतीबाने आपला धर्म मागास, गरीब दुर्दैवी लोकांत प्रसृत केला. केशवला आयुष्यात त्याच्या कार्यात यशाचा वाटा मिळाला. पण जोतीबाचे सर्व आयुष्य अपयशात गेले. केशवला दैवीसंपदा परंपरेने प्राप्त झाली होती. तो मोठा रसिक होता पण जोती सह्याद्रीच्या रुक्ष घाटमाथ्यावरील रानफळ होते. त्याने आपला सत्य धर्म इतरांकडून मधुसंचय न करता केवळ अंत:प्रेरणेने निर्माण केला. केशवचंद्राने भक्तिसंप्रदाय चैतन्य, रामकृष्ण परमहंस यांच्याशी मधुर संबंध ठेवले. जोतीने नामदेव, ज्ञानदेव, एकनाथ व तुकाराम यांची कदर केली नाही. त्याने ब्राह्म समाज व प्रार्थना समाजाच्या मूळ हेतूंचाच विपर्यास केला. केशवचंद्रास राम मोहन व देवेंद्रनाथ यांनी जमीन तयार करून दिली होती. त्यावर त्याने आपली इमारत उभी केली. १८४० मध्ये स्थापन झालेल्या परमहंस सभेने जोतीबास जमीन तयार करून दिली. त्यातून केशवच्या प्रेरणेने प्रार्थना समाज स्थापन झाला. परमहंस सभेत जोतीबा उघडपणे जात-येत होता. त्याचे रानडे, भांडारकर, गोवंडे, वाळवेकर यांच्याशी जवळचे संबंध असूनही तो तुसडेपणाने वागला. त्याने सवतासुभा उभा केला. याबाबत म. शिंदे लिहितात, "प्रार्थना समाजाचे इंग्रजी भाषेतील संस्कृत विचार अडाणी जोतीबास कळले नसावेत किंवा जोतीच्या हृदयास बसलेल्या शूद्रादी अतिशूद्रांच्या वेदनांचा चटका प्रार्थना समाजातील संभावितांना बसला नसावा. पण काहीही असो केशव व जोतीबा समकालीन असून एकमेकांस दुरावले." म. शिंद्यांच्या मते हा प्रश्न भारतातील 'सुशिक्षित' पुढारी व खंडवजा अफाट बहुजन समाजातील आडपडद्याचा आहे. हा आडपडदा कधी दूर होणार असा प्रश्न विचारून म. शिंदे लिहितात, "पहिल्याची भाषा दुसऱ्यास कळत नाही व दुसऱ्याची कळ पहिल्याच्या काळजास झोंबत नाही. असा हा मामला आहे."

जोतीराव फुले आणि केशवचंद्र सेन यांची नावे कदाचित आजच्या ज्ञानकोशात चकाकणार नाहीत. पण म. शिंदे यांच्या मते "तो दोष त्या दोघांचा नसून सर्वांशाने ज्ञानकोशाचा व त्यांच्या अनुयायांचा आहे."

म. शिंदे यांनी आधुनिक भारतातील उदार धर्माच्या चळवळींचा आढावा घेत

असताना ब्राह्म समाज, प्रार्थना समाज, आर्यसमाज व सत्यशोधक समाज यांच्या कार्याचे गुणदोषांसहित विश्लेषण केले. त्यांचे विवेचन मार्मिक आहे. ब्राह्म समाज आणि प्रार्थना समाजाचे कार्य जर उच्चभ्रू वर्गापुरतेच मर्यादित राहिले आणि त्यांचा पाया जर पोकळ पांडित्यावरच उभा राहिला तर त्यांना फारसे भविष्य नाही. कारण "विशाल बहुजन समाजाला धर्ममार्गास लावण्याचे कार्य त्यांच्या हातून होणार नाही," हे म. शिंदे यांचे विधान वस्तुस्थितिदर्शक होते, असे म्हणावयास हरकत नाही.

❑❑❑

## प्रकरण चौथे

# म. वि. रा. शिंदे आणि भागवत धर्म

ब्राह्म समाज व प्रार्थना समाज यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी आपल्या उदार धर्माच्या चळवळीस भारतीय परंपरेचा आधार दिला. ब्राह्म समाजाचा भर उपनिषदांवर होता तर प्रार्थना समाजाचा भर महाराष्ट्रातील भक्ती चळवळीवर होता. त्यामुळे भारतातील धार्मिक चळवळीबाबत म. शिंदे यांना आस्था होती. भारतात सुरू झालेली भागवत धर्माची चळवळ भक्ती, ज्ञान व कर्म यांवर आधारलेली असून सातत्याने या चळवळीने वर्णश्रेष्ठत्वाचा अहंकार, दंभ आणि बाह्य अवडंबर यांना विरोध केला. त्यांनी आपल्या 'भागवत धर्माचा विकास' या व्याख्यानमालेत भागवत धर्माच्या विकासाचा आढावा घेतला.

त्यांच्या मते भारतातील धर्मकल्पनेच्या विकासाचा विचार केला तर आपल्या हे लक्षात येईल की भारतीय संस्कृतीच्या जडणघडणीत केवळ वैदिक परंपरेने महत्त्वाची भूमिका बजावलेली नसून त्यात वैदिक परंपरेबरोबरच अवैदिक परंपरेनेही महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. वेदांच्या पूर्वीची परंपरा ही अवैदिक द्रविड परंपरा होती. चार वेदांपेक्षा भारतीय धर्मास शुद्ध रूप देण्याच्या कामी, त्याला बाह्य सृष्टीच्या साक्षात्काराऐवजी अंत:सृष्टीच्या अधिक खोल आणि खंबीर पायावर उभा करण्याचे कार्य उपनिषदांनी केले. त्यामुळे म. शिंदे यांच्या मते उपनिषदे हा भारतीय धार्मिक इतिहासातील पहिला निषेध (Protestananism) होय. त्यानंतरची ही प्रस्थापित विचार परंपरेचा निषेध करणारी परंपरा म. गौतम बुद्धाने, महावीर वर्धमानाने आणि भक्ती चळवळीने पुढे चालवलेली आपणास दिसते.

भारताच्या कोणत्याही इतिहासाची सुरुवात वेदांपासून करावी लागते पण याचे कारण वेद हे सर्वात प्राचीन ग्रंथ आहेत व भारतीय संस्कृतीचा उगम वेदांपासून झाला हे नसून आपणाजवळ वेदांव्यतिरिक्त इतर प्राचीन पुरावे उपलब्ध नाहीत हे आहे. कारण भारतीय संस्कृती वेदांपेक्षाही जास्त प्राचीन आहे. भारतातील

आर्य संस्कृतीचा उगम वेदांपासून झालेला असेल पण आर्यवंश हा भारतातील इतर अनेक मानववंशापैकी एक वंश आहे. भारतीय समाजसागरात आर्यवंशाची ही एक छोटी नदी मिळालेली आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीच्या जडणघडणीमध्ये इतर वंशांच्या योगदानाकडे आपणास दुर्लक्ष करता येणार नाही.

सध्या जरी वेद चार असले तरी मुळात त्रयी म्हणजे तीन वेदांसच मान्यता होती. हे तीन वेद म्हणजे ऋक्, साम व यजुस् हे होत. चौथा वेद अथर्ववेद. या अथर्ववेदाचा संबंध अभिचारशास्त्राशी म्हणजे जादूटोण्याशी आहे. आरोग्य सुधारण्यासाठी, शत्रूंचा व अन्य संकटांचा नाश करण्यासाठी वैदिक आर्यांना अभिचारशास्त्राची गरज भासली. चौथ्या वेदास क्षत्रवेद राजाचरण व ब्रह्मवेद असेही म्हणत. वेदांचे शुक्ल व कृष्ण असे भाग आहेत. दुसऱ्यांचे अहित न करता आपले हित साधणे हे वेदाच्या शुक्ल शाखेचे कार्य आहे तर दुसऱ्याचे अहित करून आपले हित साधणे हे कृष्ण शाखेचे कार्य आहे. आपल्या हितासाठी इंद्रादी देवतांना वश करून घेण्याचा त्यात भाग होता. वेदांत काही नैतिक भागही होता. पुढे त्या नैतिक भागाचा विकास उपनिषदात करण्यात आला. वेदांत इंद्र, अग्नी, मरुत् वगैरे देवतांची वर्णने आहेत. वेदात विष्णू येतो पण तो जादूटोण्यास वश होणारा दाखविला आहे. पण पुढे हा विष्णू उपनिषदांतील कृष्णाच्या आश्रयाने पुढे येतो. उपनिषद काळात बाह्य सकाम भक्तीऐवजी ज्ञानमार्गाचा पुरस्कार करणारा विचार प्रधान बनतो.

म. शिंदे यांच्या मते भक्ती आणि श्रद्धा भागवत धर्माचे मुख्य अंग आहे. कर्म, ज्ञान, वैराग्य व भक्ती या मानवी मनाच्या विकासाच्या चार अवस्था असून त्यातील भक्ती ही अवस्था भागवत धर्माचा आत्मा आहे. उपनिषदांत भक्तीपेक्षा ज्ञान महत्त्वाचे मानण्यात आले आहे. पण भक्तीचे तत्त्व पांचरात्रांनी व सात्वत धर्माचा पुरस्कार करणाऱ्या पंथांनी पुढे आणले. सात्वत धर्मात वासुदेव भक्ती महत्त्वाची मानली आहे. श्रीकृष्णाने प्रथम भक्तिमार्ग स्थापन केला. या धर्माचा तसा वैदिक धर्माशी संबंध नव्हता. गीता ग्रंथ हा भागवत धर्माचा मुख्य आधार. त्यातदेखील हा नवा धर्म वैदिक त्रयींवर अवलंबून नाही असे म्हटले आहे. गीता स्पष्टच सांगते की, मोक्षप्राप्तीसाठी वेद अपुरे आहेत. म. शिंदे यांच्या मते गीता हा मिश्र मतांचा ग्रंथ असला तरी गौतम बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा त्यावर खोल ठसा उमटलेला आहे. कर्मयोग, मध्यमाप्रतिपत्ती आणि निर्वाण या ज्या तीन गोष्टी गौतम बुद्धाने शिकविल्या त्यांचा गीतेवर परिणाम झाला आहे.

भारतातील भागवत धर्माच्या विकासाचा विचार करता शिंदे त्यांची विभागणी पाच भागात करतात. त्यात शैव, शाक्त व वैष्णव भागवत आणि बौद्ध व जैन

भागवत यांचा समावेश होतो. त्यांतील शैव व शाक्त भागवत अवैदिक आहेत. या भागवत धर्मात शंकर व दुर्गा यांची भक्ती केली जाते. हे देव अवैदिक आहेत कारण त्यांचा उल्लेख उपनिषदांत नाही. ती कोणत्याही वैदिक देवतांची विकसित रूपे नाहीत. कर्म (बाह्यविधी) व ज्ञान ही जशी आर्यसंस्कृतीची वैशिष्ट्ये होती त्याचप्रमाणे वैराग्य गूढज्ञान व भक्ती ही द्रविड संस्कृतीची मुख्य लक्षणे होती. त्यामुळे म. शिंदे यांच्या मते आपणास जर भागवत धर्माचा विकास समजावून घ्यावयाचा असेल तर आपण आर्यसंस्कृतीपेक्षा द्रविड संस्कृतीचा जास्त खोलवर अभ्यास करणे गरजेचे आहे.

'भागवत' या शब्दाचा उद्‌गम 'भग' या शब्दांपासून होतो. या शब्दाचा अर्थ सूर्य असा आहे. त्याचप्रमाणे या शब्दाचा अर्थ भज् म्हणजे वाटून घेणे, विभागणे असा आहे. संपत्ती व सुखे भक्तांमध्ये वाटून देणारा अशा अर्थी म्हणजे उदार, श्रीमान, कृपाळू देव असा अर्थ त्यास प्राप्त झाला. हा विशेषनामवाचक शब्द बुद्धाच्या काळात सामान्य नामवाचक झाला म्हणून त्यास वत् प्रत्यय लागून भगवत् असे रूप सिद्ध झाले. भगवान ही संज्ञा सूर्य, इंद्र वगैरे देवतांनाच नव्हे तर गौतमबुद्ध, महावीर, वर्धमान व वासुदेव यांस लावण्यात आली. भज् या शब्दापासून भक्ती या शब्दाची व्युत्पत्ती झाली. हा धातू ज्या वेळी आत्मनेपदी चालतो त्या वेळी त्याचा अर्थ आवडणे असा होतो. गीतेत भक्ती या शब्दाचा अर्थ उपासना हाच आहे. श्रद्धापूर्वक भक्ती वा प्रेम हे भागवत धर्माचे मुख्य लक्षण आहे. बाह्य कर्मठपणाचा ब्राह्मण ग्रंथात व पूर्वमीमांसा तत्त्वज्ञानात जो ऊत आलेला आहे त्या अर्थाच्या कर्मवादाला भागवत धर्मात मुळीच स्थान नाही. शाक्त, शैव व वैष्णव भागवतात केवळ तत्त्वज्ञानाला गौणत्वच आहे. श्रद्धा, भक्ती आणि शरणागती यांनाच मुख्य स्थान आहे.

म. शिंदे यांच्या मते या सर्व भागवतात देवी वा शाक्त भागवत सर्वात प्राचीन पंथ आहे. कारण त्यांचा संबंध लोकांत प्रचलित असणाऱ्या श्रद्धा व रूढी यांच्याशी आहे. दक्षिण भारतातील मूळचे कोल व मांग लोक हे म्हैसवाले होते आणि नंतर आलेले द्रविड लोक हे बैलवाले होते. या म्हैसवाल्या व बैलवाल्या लोकांत संघर्ष होऊन बैलवाल्यांचा विजय झाला व त्यातूनच 'महिषासूर मर्दिनी' या कल्पनेचा उदय झाला. भारतामध्ये काली, कराली व चंडी इत्यादी उग्र आणि सरस्वती, त्रिपुरसुंदरी, अन्नपूर्णा, तुळजा इत्यादी सौम्य देवतांचा उदय झाला. ही मूळ देवीचीच रूपे आहेत. स्त्री जननेंद्रियास संस्कृतात भग असा शब्द आहे. त्याचप्रमाणे भग म्हणजे भौमिक संपत्ती व ऐश्वर्य. त्यावरूनही भगवती ही संज्ञा प्राप्त झाली. भारतात देवीची भक्ती प्राचीन असून त्यात श्रद्धापूर्वक उपासनेचा

समावेश होतो.

शाक्त भागवत व शैव भागवत यांत जवळचा संबंध आहे. शक्ती व शिव या देवता आर्यांनी द्रविडांपासून स्वीकारल्या. शिव हा देव आर्येतरांचा होता व त्याचा आर्यांना तिटकारा होता हे आपणास वेदापासून कळते. शिवपूजा बुद्धपूर्व आहे. शैव भागवतात लिंगपूजा प्रधान आहे. शिव हा आकाशपिता व शक्ती भूमाता यांची पूजा लिंग व योनी या चिन्हांच्या द्वारेच होत असावी. सुरुवातीचे शिवाचे रौद्र रूप नंतर सौम्य झालेले आपणास दिसते. तसेच या संप्रदायातील मूर्तिपूजा मागे पडून लिंगपूजा कायम राहिली. याबाबत म. शिंदे लिहितात, "यावरून शैव भागवत पूर्वीपासूनच ज्ञान व वैराग्य मार्गाचे अभिमानी असल्यामुळे त्यांना मनुष्याकृती मूर्तिपूजेपेक्षा जगदुत्पतीचे एक पुरातन परंपरेचे केवळ चिन्ह म्हणून लिंगपूजाच अधिक पसंत असावी असे दिसते."

म. शिंदे यांच्या मते तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने विचार करता भागवत संप्रदायाचा पाया सांख्य आणि योग तत्त्वज्ञानांवर आधारलेला होता. पूर्वमीमांसेच्या कर्मठपणाशी कोणत्याही भागवत संप्रदायाचे जमले नाही. सांख्य वेदास न मानणारे व निरीश्वरवादी होते तर योगात ईश्वरतत्त्वाचा प्रसार झाला.

बौद्ध आणि जैन भागवतात जैन भागवत जास्त प्राचीन आहे. जैन तत्त्वज्ञानात ईश्वरवाद नाही पण नंतर तीर्थंकरांनीच ईश्वराची जागा घेतली. जैनांनी अहिंसा, वैराग्य, अल्पसंतुष्टत्व आणि चित्तशुद्धी यांना महत्त्वाचे स्थान दिले. जैनांनी दक्षिण व पश्चिम भारतात साहित्य, तत्त्वज्ञान, शिल्पकला, राजकारण व लौकिक सुधारणा यात मोलाची कामगिरी बजावली. जैन धर्माने भागवत धर्माच्या अहिंसा, वैराग्य, चित्तशुद्धी, जातिभेद विरोध, इंद्रिय निग्रह आणि संयम या गुणांचा प्रचार व प्रसार केला. त्यामुळे भारताच्या पुनरुत्थानात जैन भागवताचे कार्य अभिनंदनीय ठरले.

जैन भागवतानंतर बुद्ध भागवताचा उदय झाला. हे दोन्ही धर्मपंथ भारतात निर्माण झालेल्या सामाजिक क्रांतीचे अपत्य होते. गौतमाने ईश्वरालाच नव्हे तर आत्मा वा ब्रह्म या कैवल्य वस्तूस मान्यता देण्यास नकार दिला. बुद्धाचा अतुल स्वार्थत्याग, करुणा, मैत्रीभावना, संघटनाशक्ती, चातुर्य इत्यादी गुणांचा त्याच्या अनुयायांवर खोल प्रभाव पडला. पुढे बौद्ध धर्मात हीनयान व महायान असे दोन पंथ निर्माण झाले. हीनयान पंथीय बुद्धास लोकोत्तर महापुरुष मानून आपल्या वैयक्तिक साधनेस व मुक्तीस जास्त महत्त्व देतात तर महायान पंथीय बुद्धास ईश्वराचे वा शाश्वत ब्रह्माचे रूप मानून वैयक्तिक कल्याणापेक्षा सामूहिक कल्याणास



124308

जास्त महत्त्व देतात. नंतर जगभर महायान पंथाचा जास्त विस्तार झाला. दक्षिण भारतातील आक्रमक हिंदू धर्माभिमानी राजे व उत्तर भारतातील क्रूर मुसलमानी आक्रमण यांच्या पाचरीत सापडून बौद्ध व जैन धर्मांचा ऱ्हास झाला. या दोन्ही धर्मांचा ऱ्हास झाला पण त्यांनी आपले शुभ परिणाम मागे ठेवले. मात्र पुरातन वैदिक धर्माचा मागमूसही राहिला नाही. एवढेच नव्हे तर हल्लीच्या शैव व वैष्णव धर्मात आमूलाग्र बदल झाला. त्यांची वैदिक धर्माशी फारकत झाली. जैन व बौद्ध यांच्या विरक्त प्रेमी आणि परोपकारी प्रयत्नाने नूतन व विशुद्ध भागवत धर्माची वाट खुली केली हे आपणास मान्य करावेच लागेल.

महायान पंथाने बुद्धास देवरूप दिले व त्याची देवळे बांधावयास सुरुवात केली. बुद्ध धर्म आणि संघ यांस शरण जा अशी त्यांची शिकवण होती. तंत्राचा उगमदेखील महायानांच्या शिकवणुकीतून झाला. नाथपंथावर तंत्राचा व महायान बौद्ध धर्माचा प्रभाव पडला. मच्छिंद्रनाथांचा शिष्य गोरखनाथ हा स्वत: बौद्ध योगी होता.

म. शिंदे यांच्या मते बौद्ध भागवताचा विष्णू भागवतावर व्यापक परिणाम झाला. विष्णू भागवताचा उदय कृष्णकाळी झाला. कृष्ण हा वेदास न मानणारा, शिवदेवतेस मानणारा भाग्यवान मुत्सद्दी होता. देवकीपुत्र कृष्णाच्या मतांचा प्रचार प्रथम वृष्णी कुळात झाला. वासुदेव हा विष्णूचा अवतार आहे हे मत महाभारत काळात प्रभावी ठरलेले आपणास दिसते. महाभारत काळातच पांचरात्र पंथाचा उदय झाला. पांचरात्रांनी आपल्या धर्मात भक्तीस अनन्यसाधारण असे महत्त्व दिले आहे. या भागवत धर्मास सात्वत धर्म असे म्हणतात. पण नंतर या धर्मावर ब्राह्मणी धर्माचा प्रभाव पडला आणि त्यास सांप्रदायिक रूप प्राप्त झाले. पण नंतर अशोकाने बौद्ध धर्माचा जारीने प्रसार केला. त्याने धर्माचा पुनरुद्धार करून त्याचे उदारमतवादी आणि सहिष्णू रूप जगापुढे मांडले. त्याचा भागवत धर्मावर अनुकूल परिणाम झाला. पण पुढे पुष्यमित्र शुंगाच्या काळात सनातनी ब्राह्मण धर्माचा प्रभाव वाढला आणि त्याने बौद्धांवर जोरजबरदस्ती व अत्याचार केले. या काळात जरी बौद्ध धर्माचा ऱ्हास झाला तरी वैष्णव धर्माचा मोठाच जम बसला. याच काळात महाभारताचे शेवटचे संस्करण झाले. या संस्करणामुळे महाभारतात वैष्णव भागवत धर्माचा मोठा भाग समाविष्ट करण्यात आला.

छांदोग्य उपनिषदात देवकीपुत्र कृष्णास घोर अंगिरसाने दान, तप, आर्जव (सरळपणा) अहिंसा व सत्यवचन ही तत्त्वे सांगितली. पण पुढे शुंगकाळात कृष्णास विष्णूचा अवतार मानण्यात आले. हा अवतारवाद मूळ गीतेत नव्हता

पण पुढे गीतेत वासुदेवाची जागा विष्णूने घेतली. वैष्णव भागवतावर बौद्धांचा ज्याप्रमाणे प्रभाव आहे त्याचप्रमाणे त्यावर ब्राह्मणांचाही प्रभाव राहिला. जैन व बौद्ध भागवतांना तोंड देण्यासाठीच ब्राह्मणांच्या वर्चस्वाखाली वैष्णव धर्माची स्थापना झाली.

भगवद् गीता हे हिंदू धर्माचे आध्यात्मिक काळीजच समजले पाहिजे. कारण हा ग्रंथ हिंदू धर्मातील विविध तत्त्वज्ञान, धार्मिक भावना व धार्मिक इतिहास यांचा एक अतिसंक्षिप्त असा निष्कर्ष आहे. गीतेच्या विकासाचे विवेचन शिंद्यांनी गार्बेच्या मतानुसार केले आहे. गार्बेच्या मते गीतेत सांख्य, योग आणि उत्तरमीमांसा या तत्त्वांची सरमिसळ आहे. त्या काळातील ब्राह्मण व क्षत्रिय वर्गातील संघर्षाचे प्रतिबिंब गीतेत पडलेले आपणास दिसते. अशोकानंतर मौर्यांचा ऱ्हास झाला. शुंग व कण्व वंशांच्या राजांनी ब्राह्मण धर्माचे वर्चस्व स्थापन केले. बौद्ध, जैन व शैव भागवतास ग्रहण लागले. राम, कृष्ण इत्यादी क्षत्रिय विभूतींच्या ऐतिहासिक स्वरूपाचा लोप करून त्यांचे नुसते पौराणिक देव्हारे माजविण्यात आले. क्षत्रियांच्या वर्चस्वालाच नव्हे तर सनातन भागवत धर्मालाही वैष्णव संप्रदायाने कायमचे ग्रहण लावून ब्राह्मणी वर्चस्वाची मेढ रोवली.

म. शिंदे यांच्या मते कोणत्याही धर्माचा आरंभ एका विशिष्ट जातीच्या अगर भाषेच्या राष्ट्रात स्थानिक स्वरूपात होतो. भारत तर अशा अनेकविध राष्ट्रांचा समुदायच होता. मौर्य घराण्याची साथ मिळाल्यानंतर गौतम बुद्धाचा धर्म सार्वत्रिक झाला. स्थानिक परिस्थितीत जन्मास आलेल्या धर्माचा बहुजन समाजात वेगवेगळ्या मार्गांनी व वेगवगेळ्या साधनांनी प्रचार केला जातो. त्यात मंदिरे, मूर्तिपूजा, भजन यांची भूमिका महत्त्वाची ठरते. त्याचप्रमाणे तंत्र-मंत्र, पुराणे यांचा प्रचार झाला. बौद्ध व हिंदू देवतांची सरमिसळ झाली. ब्राह्मणांनी पुराणांचा वापर करून लोकांत आपला धर्म रुजवला. मूळची क्षत्रियांनी रचलेली पुराणे ब्राह्मणांनी आपल्या हातात घेऊन त्याचे नवे संस्करण तयार केले. पुराणातील बहुरंगी तांत्रिक पूजा व उपासना सर्वमान्य झाली. ओंगळ वेदोक्त विधींवर भक्तीचा प्रसार करणाऱ्या पुराणोक्त विधींनी मात केली. भागवत धर्माच्या प्रचारात पुराणिक, हरिदास, कथेकरी यांनी मोलाची भूमिका बजावली. हरिदास बहुजन समाजात लोकप्रिय होते.

भारतात भागवत धर्मास नवे रूप व नवा आशय प्रदान करण्याचे कार्य दक्षिण भारतातील भक्ती परंपरेने केले. 'भागवत माहात्म्य' हा ग्रंथ सांगतो की भक्तीचा उदय द्रविड देशात झाला. तिचा विकास व वाढ कर्नाटकात झाली.

महाराष्ट्राच्या काही भागात तिचा विकास झाला. इ. स.च्या सातव्या व आठव्या शतकात अलवारी संतांनी तामिळनाडूत भक्ती चळवळीस सुरुवात केली. तमिळ भाषेत शैव व वैष्णव पंथाच्या संतांनी भक्तियोग सांगितला. तेथे शिवभक्तांना अड्यार आणि विष्णू भक्तांना आळ्वार ही संज्ञा आहे. हे संत सर्व जातींतून आले होते. ते हरीहर ऐक्याचे पुरस्कर्ते होते. ते जातिभेद मानीत नव्हते. त्यांच्या शुद्ध वर्तनामुळे व वैराग्यामुळे त्यांच्या धर्माचा सगळीकडे प्रचार व प्रसार झाला. म. शिंदे यांच्या मते दक्षिण भारतातील भक्ती चळवळीचा महाराष्ट्रातील चळवळीवर मोठा परिणाम झाला.

महाराष्ट्रात भागवत धर्माची मुहूर्तमेढ रोवण्याचे कार्य नामदेव व ज्ञानदेव यांनी केले. नामदेव संघटक कार्यकर्ता होता तर ज्ञानदेव कवी व तत्त्वचिंतक. नामदेव कीर्तनकार होता. तो पंडित नव्हता पण ज्ञानदेवापेक्षा कर्ता पुरुष होता. ज्ञानदेव व नामदेव हे दोघेही गोरखपंथी शैव होते. पण महाराष्ट्रात शैव-वैष्णव वाद नसल्यामुळे त्यांनी पंढरपूरच्या विठ्ठलाला आराध्य दैवत मानले. या वारकरी संप्रदायात सर्व जातींतून जगद्वंद्य संत निर्माण झाले.• नामदेवाने तर केवळ दक्षिणेतच नव्हे तर उत्तरेतही भागवत धर्माची पताका रोवली. हिंदी भाषेत पदरचना केली. त्याने जे विचारबीज पंजाबात रोवले त्यातून कबीर, दादू, नानक यांच्यासारखे थोर संत निर्माण झाले. शिंदे यांचे असे निरीक्षण आहे की पंढरीचे ठाणे पूर्वी बौद्ध व नंतर शैव धर्माचे होते. त्यांच्या मते वारकरी संप्रदाय लोकसत्तात्मक होता. कारण पंढरीचा देव भक्ताच्या ताब्यात आहे. तेथे कीर्तनाच्या क्षेत्रांत सर्व जातींतील संतांना प्रवीणत्व प्राप्त झाले. तेथे महत्त्वाचे फड ब्राह्मणेतरांच्या ताब्यात आहेत. त्यात जातीय व पांथिक भेदभाव नाही. अठरापगड जातींच्या वेगवेगळ्या वारकऱ्यांचे हक्क समान आहेत. राधा-भक्तीचा मामला येथे खपत नाही. या पंथास राजकारणाची विषबाधा झालेली नाही. त्रैवर्णिकांच्या कुटिल नीतीस बळी न पडता वारकरी पंथ जनतेचा आधार व बळ यावर उभा आहे. वारकरी संप्रदायाचा कळस तुकाराम असून त्यास नामदेव, ज्ञानदेव व एकनाथ यांचा आधार आहे.

महाराष्ट्रात तथाकथित राष्ट्रवादी विचारवंतांनी अकारण मराठी संतांची निंदा सुरू केली. त्यात इतिहासाचार्य राजवाडे व 'महाराष्ट्र सारस्वत'कार वि. ल. भावे यांचा समावेश होतो. राजवाड्यांनी महाराष्ट्रातील परकीय राजवटीला संतांचा पंगूपणा कारणीभूत होता असे मत मांडले. भाव्यांनी रामदास हा प्रवृत्तीमार्गी संत होता, तो राजकारण धुरंधर होता, तुकारामापेक्षा सरस होता अशी मते मांडली. या दोघाही इतिहासकारांचा शिंद्यांनी समाचार घेतला. त्यांच्या मते भागवत धर्मास 'ग'ची बाधा झालेली नाही. त्यास स्वदेश, स्वधर्म वगैरे 'स्व'चा पण सोस नाही.

कारण भागवत धर्माचे उद्दिष्ट थोर आहे. एकनाथांनी स्वदेशाची आणि स्वभाषेची जी सेवा केली ती स्वाभिमान जागा करण्यासाठी केली नसून ज्ञानोबाने सांगितलेला विश्वात्मक भाव जागृत करण्यासाठी केली. कोणाही वारकऱ्यास भागवत धर्माचे वर्म काय म्हणून विचारता तो उत्तर देतो की "कोणाही जीवाचा न घडो मत्सर वर्म सर्वेश्वर पूजनाचे."

म. शिंदे यांच्या मते इ.स.च्या पहिल्या सहस्रकात महाराष्ट्र जैन व बौद्ध या धर्मांचा जोर होता. पण नंतर त्या धर्मास उतरती कळा लागली व शैव संप्रदायाचा जोर वाढू लागला. मराठ्यांत गोरखनाथ पंथाची वाढ झाली. नाथपंथ हे बौद्ध व शैव धर्माचे मिश्रण होते. आर्यांचे जसे वेद हे ग्रंथ महत्त्वाचे तसे द्रविडांचे आगम ग्रंथ महत्त्वाचे. या ग्रंथांच्या आधारे बाराव्या शतकात शैव धर्माने उचल खाल्ली. बसवेश्वराने लिंगायत पंथाची स्थापना केली. लिंगायत पंथ हा धर्मसुधारक पंथ असल्यामुळे त्यात बौद्ध धर्माची काही लक्षणे उतरली. त्यात जातिभेद, मूर्तिपूजा, तीर्थयात्रा, मंदिरांतील आराधना यांस फारसे महत्त्व नाही. बायकांना समान हक्क असून कोणासही लिंगधारणा करता येते. लिंग म्हणजे निर्गुण, निराकार लिंगदेही ईश्वर. या पंथाचा ब्राह्मण धर्माशी कडकडीत विरोध असल्यामुळे पंथाची रचना वेगळी झाली. महाराष्ट्रातील महानुभाव पंथातदेखील मूर्तिपूजा व जातिभेद नाही. धर्मसुधारणा, प्रगती, समता व मराठी भाषेवर प्रेम हे या पंथाचे विशेष आहेत.

भागवत धर्माच्या विकासात रामानंद व कबीर यांनी मोलाची भूमिका बजावली. रामानंद वैष्णव होता व अठरापगड जातीतील लोक त्याचे शिष्य होते. त्यात पीपा राजपूत, सेना न्हावी, धन्ना, जाट, दादू पिंजारी, कबीर जुलाहा व रोहीदास चांभार यांचा समावेश होतो. पद्मावती ही शिष्या होती. द्रविड प्रांतात निर्माण झालेल्या भक्तिरसाचा ओघ बंगाल प्रांतात पोहोचला आणि तेथे चैतन्य संप्रदायाचा उदय झाला. बंगालात यापूर्वी बौद्ध, शाक्त व तंत्र यांच्या विचारांचा पगडा होता. चैतन्याने वैष्णव भक्ती चळवळ सुरू केली आणि लोकांनी तिला चांगलाच प्रतिसाद दिला. चैतन्य संप्रदायात जरी अनेक जातींचा समावेश होता तरी त्यात मागास जातींचा पगडा होता.

या सर्व चळवळींचा परिपाक म्हणजे पंजाब प्रांतात स्थापन झालेली गुरू नानक यांची शीख धर्माची चळवळ. शीख धर्म हा पुरोगामी विचारांचा व सुधारणावादी आचारांचा धर्म असून या धर्माच्या तत्त्वज्ञानावर काही प्रमाणात इस्लामचा पगडा होता. एकेश्वरवाद, निराकार अकाल पुरुषाची उपासना, समानता, स्वातंत्र्य व बंधुत्व या मूल्यांचे आचरण ही शीख धर्माची वैशिष्ट्ये. शिखांचे

दहावे गुरू गोविंदसिंग हे तेजस्वी योद्धे होते. गुरुजींना केवळ स्वसंरक्षणासाठी क्षात्रवृत्ती स्वीकारणे भाग पडले. त्यांनी शिखांच्या राजकीय सत्तेची मुहूर्तमेढ रोवली. त्यांनी जातिभेदास विरोध केला. त्यांच्या पंचप्याऱ्यांत त्रैवर्णिकांतील कोणीही नव्हता! निराकार अकाल पुरुषाची भक्ती, चित्तशुद्धी आणि मानवी समानता या भागवत धर्माच्या मूळ तत्त्वांना प्रत्यक्षात आचरणात आणण्याचा शीख धर्मगुरूंनी प्रयत्न केला.

भागवत धर्माचा विकास गुरू गोविंदसिंग यांच्याआधीच थांबलेला नाही. आजचे ब्राह्म समाज, आर्यसमाज, प्रार्थना समाज व सत्यशोधक समाज याच भागवत धर्माचा विकसित असा आविष्कार आहेत. कारण म. शिंदे यांच्या मते भागवत धर्म सनातन आहे आणि त्याचे कार्य निरंतर चालणार आहे.

आपल्या 'भागवत धर्माचा विकास' या व्याख्यानमालेत म. शिंदे यांनी व्यापक ऐतिहासिक दृष्टिकोण स्वीकारून भागवत धर्माची मीमांसा केलेली आहे. त्या काळात राजवाडे, पांगारकर, भावे आणि शं. दा. पेंडसे यांनी भागवत धर्माची मीमांसा वेदांना केंद्रस्थानी ठेवून केलेली मीमांसा होती. शिंद्यांचा दृष्टिकोण जास्त समतोल आणि ऐतिहासिक होता कारण त्यांनी भागवत धर्माच्या विकासात वेदाशिवाय इतर परंपरांनी व संस्कृतींनी बजावलेल्या भूमिकांची चर्चा केली आणि भागवत धर्माच्या जडणघडणीत वेदांची भूमिका किती छोटी होती हे दाखवून दिले. भागवत धर्ममध्ये भक्तीला प्राधान्य असले तरी त्यांत धर्मसुधारणा, जातिव्यवस्थाविरोध, पुरोहितशाही व मूर्तिपूजा यांस विरोध, चित्तशुद्धी, मनाचा निर्मळपणा व सेवावृत्ती इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. भक्ती, वैराग्य आणि निष्काम कर्मयोग यांच्यावर भागवत धर्माचा विश्वास आहे. प्रखर नैतिक भूमिका, समानता, मनाची शुद्धता आणि सर्वात्मक भाव ही भक्तिसंप्रदायाची मुख्य तत्त्वे होती. त्यामुळे गेल्या अडीच हजार वर्षांत भारतात ज्या ज्या चळवळी प्रगती, समता आणि बंधुभाव यांचा पुरस्कार करतात त्यांचा शिंदे यांनी भागवत धर्मात समावेश केला. कारण वैदिक धर्मातील सकाम पूजा, हिंसा, यज्ञयाग, ब्राह्मण धर्मातील विषमता, जातिवाद यांना भक्तिमार्गी संतांनी विरोध केला.

❑❑❑

प्रकरण पाचवे

# म. वि. रा. शिंदे यांची धर्मकल्पना

म. वि. रा. शिंदे यांनी आपल्या धर्मकल्पनेचा विकास ब्राह्म समाज व प्रार्थना समाज यांनी विकसित केलेल्या धर्मकल्पनेच्या आधारे केला. आपल्या धर्मकल्पनेची व्याख्या करताना म. शिंदे लिहितात, "आत बाहेर सर्वत्र नांदणारा जो परमात्मा व व्यक्तिविशिष्ट जो जीवात्मा यांचा परस्परसंबंध व निरंतर समागम यास धर्म म्हणतात. अंतर्याम उच्च मनोविचार, नैतिक शक्ती इत्यादींच्या द्वारा बाह्यसृष्टी, अंत:सृष्टी व जगाचा विकासमय इतिहास या तीन प्रदेशात जिवंत जागृत परमेश्वराचे प्रतिक्षण काय काय व्यवहार घडतात ते ओळखणे, कृतज्ञतापूर्वक त्याचे सान्निध्य राखणे व संसारातील लहान-मोठी कामे त्याच्या सान्निध्यास शोभतील अशी करणे ही आमची कर्तव्ये." ते पुढे असे म्हणतात की "धर्म ही बाब मुळी पढीक शिक्षणाची नव्हे, तेथे परमेश्वरच गुरू, विश्व हीच शाळा व सृष्टी हेच पुस्तक. त्यामुळे आपल्या स्वत:चा आंतरिक विकास करणे हे धर्माचे उद्दिष्ट. धर्माची देणगी देवाने माणसास दिली आहे. या बीजरूपी देणगीची लागवड करणे, तिचा विकास करणे हे प्रत्येक माणसाचे कर्तव्य आहे. उत्तरोत्तर विकास पावणाऱ्या मानवी शक्तीच्या साह्याने आणि बदलत्या परिस्थितीस अनुसरून श्रेष्ठाने कनिष्ठास, जाणत्याने नेणत्यास, पवित्राने पतितास या देणगीचा लाभ दिला नाही आणि स्वत:मध्ये ती वाढविली नाही तर धर्माची मूळ ज्योत विझली असे समजावे." अंत:साधना व बाह्यसेवा ही धर्माची दोन वैशिष्ट्ये शिंदे यांनी वरील विवेचनात मांडलेली आपणास दिसतात. अंत:साधनेच्या द्वारा माणसाचे चित्त शुद्ध व चोख ठेवणे आणि त्याचा उत्तरोत्तर विकास करणे आवश्यक आहे. बाह्यसेवेचा उद्देश समाजातील सर्व थरांत धर्माचा प्रचार करणे हा आहे.

त्यामुळे म. शिंदे यांच्या मते मानवी जीवनात धर्माची भूमिका महत्त्वाची ठरते. जगाच्या आतापर्यंतच्या उन्नतीत व प्रगतीत, जगाच्या इतिहासाच्या विकासात

व जगात ज्या ज्या सुधारणा झाल्या त्यांच्यामागे धर्मबुद्धी आहे. धर्म ही बाब अंत:करणाची आहे आणि जसजसा माणसाचा विकास होतो तसतशी धर्माची पण प्रगती होते. कारण मानवी व्यवहारात धर्म आणि लौकिक व्यवहार परस्परांपासून वेगळे नसून धर्म व्यवहाराच्या तळाशी, मधे आणि शेवटी व्यापून राहणारी आपल्यामधील वृत्ती आहे. शरीरात व सर्व अवयवांत प्राण ज्या प्रमाणे व्यापून राहतो त्या प्रमाणे धर्म आमच्या सर्व व्यवहारात व्यापून राहिलेली वृत्ती आहे. तिचा दर्जा आणि जोर यांवर आमच्या व्यवहाराचे रंगरूप बदलते.

भारतीय परंपरा धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ मान्य करते. शिंदे म्हणतात की अर्थ व काम हे पुरुषार्थ समर्याद आहेत. पण मोक्ष पुरुषार्थ अमर्याद आहे. अर्थाच्या साह्याने काम पुरुषार्थाची तृप्ती होते. त्यामुळे त्यास मर्यादा आहेत. काही लोकांचे असे मत आहे की धर्म म्हणजेच नीती. पण ते तेवढे बरोबर नाही. नीतीचा संबंध माणसाच्या परस्पर व्यवहारांशी आहे. आपण जगात एकटे किंवा आपणास एकान्तात निर्जन स्थळी सोडून दिले असता नीतीचा हा भाग लोप पावतो. पण आपल्या मनात उद्भवणारी सुखदु:खे, यत्न, विश्रांती, विवेक, श्रद्धा, आज्ञा इत्यादी थोर, गंभीर व पवित्र भावनांचे जे साम्राज्य चालू असते त्याला अशा एकान्तवासाने बाधा येत नाही. या भावना म्हणजे धर्म होय. त्याचे पोषण करणे; त्यात उत्तरोत्तर संशोधन व वृद्धी करणे हे धर्मसाधन होय. कारण मनुष्य जातीचा आणि सर्व जड सृष्टीचा जो विकास चालू आहे त्याचाच एक भाग म्हणजे धर्मसाधन होय. प्रेम, पश्चात्ताप व आत्मपरीक्षण ही धर्मसाधनेची मुख्य अंगे आहेत. धर्मसाधन हे प्रत्येक व्यक्तीने चिंतन, मनन, आत्मसंयमन, आत्मपरीक्षण, सेवा, सहनशीलता इत्यादी द्वारा स्वत:च्या अनुभवाने व प्रयत्नानेच केले पाहिजे असे शिंद्यांचे मत होते. धर्माच्या मदतीने मानवी भावना शुद्ध बनतात. मानवी जीवनाच्या सर्व अंगांचा विकास होतो. मनुष्यमात्राचा धर्म म्हणजे ईश्वराचे ज्ञान करून घेणे. त्यास शरण जाणे, त्याने लावून दिलेली सेवा सांभाळणे हा आहे.

म. शिंदे यांच्या मते माणसाने हजारो वर्षांत मोठी प्रगती केली आहे. या प्रगतीमागे ईश्वरेच्छा तर आहेच. मननशीलता हा मनुष्याचा धर्म. त्यामुळे त्याने अनेक देवतांपासून एकेश्वरवादाकडे प्रगती केली. तौलनिक धर्मशास्त्राचा उद्देश ईश्वर आहे की नाही हे दाखविणे हा नसून ईश्वर भावनेची शुद्धी कसकशी होत गेली हा आहे. शुद्धीची दिशा ही की, ईश्वर ही कोणी शरीरविशिष्ट व्यक्ती नसून सर्वव्यापी शुद्ध चैतन्य आहे. देहभाव पूर्ण नाहीसे होऊन ईश्वर केवळ गुणाश्रय मानणे व त्या विषयी सम्यक् भावना व्यक्त करणे महत्त्वाचे. तो दयेचा आणि

प्रेमाचा प्रेरक आहे. त्यांच्यामते जगात सद्‌गुण व दुर्गुण अशा दोन भिन्न परस्परविरोधी स्थिती मुळीच नाहीत. जे काय आहेत ते गुणच आहेत. उदा., मनुष्य प्रेमामुळे इतरांवर उपकार करतो व लोभामुळे अपकार करतो. पण प्रेम व लोभ हे परस्परविरोधी पदार्थ नाहीत, तर उत्क्रांतीच्या पायरीवरचे गुण आहेत. दोन्ही सत्कार्याचीच साधने आहेत. प्राणिमात्रांनी आत्मसंरक्षण करावे यासाठी ईश्वर लोभाचा प्रवर्तक होतो आणि आत्मसंरक्षणाचे खालचे कार्य चांगले स्थायिक झाल्यावर परहितसाधनेसाठी तो प्रेमाचा प्रवर्तक होतो. आपण मात्र जर वरच्या पायरीवर पोहोचूनही वरच्या प्रेरणांना न जुमानता खालच्या प्रेरणांना वश झालो तर आपल्याला दिलेल्या स्वतंत्रतेचा आपण दुरुपयोग केला असे होईल. ईश्वर दुर्गुणांचा प्रवर्तक असत नाही कारण दुर्गुण असा कोणताच नाही. शौर्य व भीती, सहिष्णुता व असहिष्णुता, जितेंद्रियता व कामाधीनता यांचे प्रयोजन प्रथम समजून घ्यावे लागते. उत्क्रांतीच्या कार्यासाठी त्याच्या पायऱ्या ईश्वरानेच लावून दिलेल्या आहेत.

ईश्वर सत्त्वाचा, शुभाचा व मांगल्याचा प्रेरक व प्रवर्तक आहे. येथे बुद्धीपेक्षा विश्वास महत्त्वाचा असतो. आपल्या शरीरात जीव-चैतन्य नांदते तर विश्वात विश्व-चैतन्य — ज्याला आपण ईश्वर म्हणतो ते नांदते. जीव-चैतन्यावर धर्मसंस्था, कुटुंबसंस्था, राज्यसंस्था व समाजसंस्था यांचे दडपण असते. त्याचबरोबर त्यावर अंत:करणाचे दडपण असते. हे दडपण अहितकारक असतेच असे नाही पण ते दडपण असते हे मात्र खरे. या दोन्ही दडपणांतून मार्ग काढणे; प्रयत्न करणे व ध्येय साध्य करणे आवश्यक असते. प्रयत्न करीत असतानाही सत्याची कास धरणे गरजेचे असते. माझे कितीही हाल झाले तरी मी सत्याचा आग्रह सोडणार नाही. असा विश्वास असला पाहिजे. त्याशिवाय आपल्या स्वत:ची आणि आपल्या देशाची उन्नती होणार नाही.

चार पुरुषार्थात धर्म आणि काम हेच महत्त्वाचे पुरुषार्थ आहेत. धर्म याचा खरा अर्थ कर्तव्यपूर्ती असा आहे. काम याचा खरा अर्थ मनाची इच्छा वा भूक असा आहे. माणसाच्या स्वाभाविक प्रवृत्तीप्रमाणे वस्तू सुंदर व रुचकर आहे म्हणून ती घेण्याची इच्छा होणे म्हणजे काम व ती सुंदर व रुचकर असो वा नसो तिची योग्यायोग्यता बघून स्वीकार करणे, योग्य गोष्टी स्वीकारण्याची आतून प्रेरणा होणे यास धर्म म्हणतात. या दोन्ही प्रवृत्ती लक्षात घेऊन आत्म्यास दोन पुरुषार्थ साध्य करायचे असतात. ते साध्य असताना त्याचे केवळ एक उपकरण म्हणूनच अर्थसंचय करायचा असतो. कामना व कर्तव्यपूर्ती या ईश्वराने दिलेल्या असून

प्रत्येकीचा विकास एक-दुसरीवर अवलंबून आहे. याबाबत निवृत्तीचा वा संन्यासाचा मार्ग म. शिंदे यांना मान्य नव्हता. म्हणून ते म्हणतात की, "जे उपभोग्य पदार्थ ईश्वराने निर्माण केले त्यावर आसक्ती न ठेवता ते सेवन करावेत."

भक्ती आणि प्रेम यांची धर्मसाधनेत महत्त्वाची भूमिका असते. प्रेमाची व्याख्या करताना म.शिंदे लिहितात की, ईश्वराचे ठिकाणी आमचा जो ऐक्य संबंध आहे व जो संसारात अनेक अदृष्ट कारणांमुळे तुटलेला आहे तो पुन्हा जोडणे म्हणजे प्रेम होय. प्रेम हे जीवनाचे मुख्य लक्षण होय. प्रेमामुळे व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-राज्य व व्यक्ती-विश्व यांतील भेद कमी होतो. प्रेमामुळे समाजात एकात्मता निर्माण होते. संसारात आत्मा व परमात्मा यांच्यातील सततचा संबंध म्हणजे प्रेमसंबंध होय. वत्सलता, प्रणय, सख्यभाव आणि अनुकंपा हे त्यांचे वेगवेगळे आविष्कार आहेत.

भक्तीची खरी भावना आपल्या अंत:करणात भिडणे आवश्यक आहे. भक्ती म्हणजे संपूर्ण अवाढव्य विश्वव्यापारात स्वत:च्या दुर्बलतेविषयी येणारे साक्षात अनुभव; विश्वात नांदणाऱ्या सनातन शक्तीचा साक्षात्कार आणि त्यामुळे निर्माण झालेली मनाची प्रसन्नता होय. या सर्वांनाच मराठी संतांनी स्वानुभव हे नाव दिले आहे. व्यक्तीच्या आध्यात्मिक उन्नतीचा स्वानुभव हा महत्त्वाचा भाग आहे. स्वानुभव अंगी आल्याची खूण म्हणजे मनात करुणा, मुदिता, मैत्री व अपेक्षा या भावनांचा उदय होणे ही आहे. पिडलेल्या लोकांबद्दल आपल्या मनात अनुकंपा बाळगणे म्हणजे 'करुणा' होय. करुणेने प्रेरित झाल्यावर आपल्या मनाची स्थिरता व समता भंग न होऊ देणे म्हणजे 'मुदिता' होय. या मोदविशिष्ट करुणेने प्रेरित होऊन सर्व जीवांची प्रेमयुक्त सेवा करणे म्हणजे 'मैत्री' होय. जगातील दुष्टपणा आपण प्रयत्न करीत असूनही कमी होत नाही म्हणून त्याबाबत उदासीनता दाखवणे, मनाचे स्थैर्य कायम ठेवणे व मैत्रीचा व्यवहार चालू ठेवणे यालाच 'अपेक्षा' म्हणतात. गौतम बुद्धाने चार तत्त्वांची शिकवण आपणास दिली.

शिंद्यांच्या मते सात्त्विक, राजसिक आणि तामसिक हे भक्तीचे तीन प्रकार आहेत. ज्ञानयोग साधून मोक्ष मिळविणे, उदासीन वृत्तीने जीवन जगणे, संन्यास घेणे हा जीवनाचा मार्ग नव्हे. माणूस जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत त्याला प्रकृतीने लावून दिलेली कामे करणे भाग आहे. उदासीन व संन्यस्त राहूनही त्याला प्रकृतीची गुलामगिरी करावीच लागणार आहे. ज्ञानापलीकडे वेदान्तापासून इतरांस कोणताच फायदा नाही. पण भक्त ईश्वराची चाकरी सेवा म्हणून करतो. ज्ञानयोग साधून संसारातून उठावे व प्रकृतीचे दास्य पत्करावे की कर्मयोग साधून ईश्वराचे

मित्र होऊन पृथ्वीवर स्वर्ग आणावा याचा विचार स्वतंत्र माणसांनी करावा. म. शिंदे यांचे असे मत होते की हा कर्मयोग साधणे हा आमचा धर्म आहे. संसारात आपली नियत कर्तव्ये आनंदाने करण्यात तो सामावला आहे. ज्ञानाचे भक्तीत आणि भक्तीचे कर्मयोगात नेहेमी पर्यवसान होत असते.

भक्तीचा आत्मा विनययोग आहे. गौतम बुद्धाने तीन प्रकारे आपणास विनययोग साध्य करता येईल असे सांगितले. ते तीन प्रकार म्हणजे १) आपण नेहमी सुखी राहण्याचा प्रयत्न करावा, २) दु:खी राहण्यात कोणताही धार्मिकपणा आणि मोठेपणा नाही आणि ३) आपल्यापाशी जे सुख आहे ते सर्वांमध्ये सर्वकाळ दशदिशा पसरवावे यातून सख्यभाव जागृत होतो.

धर्म आणि विज्ञान व धर्म आणि तत्त्वज्ञान यांच्यातील परस्पर संबंधांची म. शिंदे यांनी मीमांसा केली. त्यांच्या मते धर्म व विज्ञान यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा संघर्ष नाही. युरोपात ज्या वेळी युनिटेरियन चळवळ सुरू झाली त्या वेळी तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात खालील चार प्रवाह होते. ते प्रवाह म्हणजे

१) अनुभवजन्य ज्ञानवादी (डार्विन आणि स्पेन्सर)

२) अतींद्रिय ज्ञानवादी (कांट व हेगेल)

३) ऐतिहासिक धर्मचिकित्सावादी आणि

४) तौलनिक धर्मशास्त्रवादी

या चार प्रवाहांत स्वत: शिंदे तौलनिक धर्मशास्त्राचा पुरस्कार करीत होते. त्यामुळे इतर तीन प्रवाहांचा थोडक्यात परिचय देऊन त्यांनी असे मत व्यक्त केले आहे की तौलनिक धर्मशास्त्राचा पाया शास्त्र, तत्त्वज्ञान, इतिहास आणि मीमांसा यांच्या आधारावर उभारण्यात आला आहे. त्यात बुद्धिवादास महत्त्वाचे स्थान आहे. तो वेडगळ धर्मसमजुती व अंधश्रद्धा यांना विरोध करतो. पण त्यास बुद्धिवादाचा अतिरेक आवडत नाही. कारण तो हटवादात परिवर्तित होतो. त्यामुळे समाजात भेद व दुही माजते. सत्याचा शोध, नैतिक वर्तणूक आणि मनाची रसिकता व प्रसन्नता ही त्यांच्या धर्मसाधनेची वैशिष्ट्ये म्हणावयास हरकत नाही. त्यामुळे व्यक्तीस सत्त्व आणि स्वातंत्र्य याचा लाभ होतो असे शिंदे यांचे मत होते.

'परमार्थाची प्रापंचिक साधने' या विषयांतर्गत म. शिंदे यांनी पाच व्याख्याने दिली. मानवी आदर व दैवी श्रद्धा, मानवी स्नेह व ईश्वर भक्ती, मनुष्यसेवा व ईश्वरोपासना, मनाची प्रसन्नता आणि मोक्षप्राप्ती आणि प्रपंच व परमार्थ यांची

एकवाक्यता या विषयांवर त्यांनी ही व्याख्याने दिली.

आपल्या पहिल्या व्याख्यानात म. शिंदे यांनी मानवी आदर आणि दैवी श्रद्धा यांचे विवेचन केले. परमेश्वरावर प्रथम भाव ठेवणे, त्यासच आपल्या प्रेमाचा विषय करणे, त्याची इच्छा तीच आपली इच्छा अशा भावनेने त्याची सेवा करणे या तीन साधनांच्या द्वारे प्रारब्ध क्रियमाण व कर्मसंचय यातून मुक्त होणे या परमार्थाच्या चार पायऱ्या समजण्यात येतात. हा मार्ग तसा कठीण आहे. प्रापंचिक व्यवहार व त्यातील अपूर्णता समूळ नाहीशी होऊन तेथे केवळ परमार्थाचे साम्राज्य चालेल हे संभवत नाही. व्यक्तिविषयक अपवाद सोडून दिले आणि सर्व मनुष्यमात्राच्या समवाय साधायचा असला तरी तो आमच्या रोजच्या प्रापंचिक व्यवहारासच हळूहळू योग्य वळण देऊन साधणार आहे. हे वळण देण्यास सुरुवात करणे म्हणजे ज्या प्रमाणे आपण परमेश्वराशी आदरभावाने वागतो त्या प्रमाणे सर्व मनुष्यप्राण्यांशी, भूतमात्रांशी आदराने वागणे होय. दुसरी गोष्ट म्हणजे एखाद्याने जर अपराध केला असेल तर त्याला क्षमा करणे आणि दुसऱ्यावर आपल्या स्वत:प्रमाणेच प्रेम करणे होय. इतरांच्या बद्दल आदरबुद्धी तीन प्रकारांनी ठेवता येते. पहिला प्रकार म्हणजे जसे आपले मत आपणास पूज्य असते तसेच इतरांनाही आपले मत पूज्य असते ही जाणीव मनात ठेवून चर्चा करणे होय. दुसरा प्रकार म्हणजे दुसऱ्यांची मनोवृत्ती सांभाळणे. दुसऱ्याने आपणाशी ज्या प्रकारे वागावे असे आपणास वाटते त्या प्रमाणे आपण दुसऱ्यांशी वागले पाहिजे. तिसरा प्रकार म्हणजे केवळ दुसऱ्यांचे दोषच न पाहता दुसऱ्याच्या गुणांचे व कृतीचे योग्य मंडन केले पाहिजे. दुसऱ्याच्या आनंदाने आपण आनंदी होणे हे मोठेपणाचे लक्षण आहे.

'मानवी स्नेह आणि ईश्वरभक्ती' या व्याख्यानात स्नेहसंबंध वाढवणे हा ईश्वरभक्तीचा उत्तम उपाय आहे असे म्हटले आहे. आपला ज्या वेळी एखाद्याशी स्नेहसंबंध जुळतो तो केवळ कर्तव्यबुद्धीमुळे; शासनाच्या दडपणामुळे ओढून ताणून आणलेला नसतो तर ती एक मनाची स्वाभाविक ओढ असते. स्नेहसंबंधामुळे एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीशी गुंतलेली दिसते. स्नेहामुळे आपल्यातील उणीव भरून निघते व त्यामुळे आपला आदर्श पूर्ण करता येतो. मित्रत्त्वाचा विकास आपल्या व्यक्तिमत्वाच्या विकासाबरोबर होतो. मित्राशी तादात्म्य पावल्यानंतर त्याचा वियोग झाल्यावर शोक होतो. या शोकातूनच अतिगंभीर तत्त्वविचारांचे स्मरण होऊन थोर विचारांचे दर्शन होते. त्यातून विरह, उद्वेग, निराशा, विचार, शंका, आशा, श्रद्धा, आनंद अशी आध्यात्मिक अनुभवाची परंपरा निर्माण होते.

अज्ञेयवादी टेनिसन स्नेहसंबंधाच्या प्रभावामुळे किंबहुना त्याच्या विरहामुळे श्रद्धाळू आणि आनंदवादी भक्त बनला. अनेक वेळा बाह्य उपाधीमुळे व आंतरिक दोषांमुळे स्नेहसंबंध कमजोर झाले तर त्यास बळकट करणे आपले कर्तव्य आहे. स्नेहामुळे आम्ही जगात आनंदाने वावरू. एका मित्राचा वियोग झाला तर तो सर्वव्यापी आहे असे समजून आणि आकुंचित वृत्ती सोडून सर्व जग माझे मित्र आहे अशी भावना मनात निर्माण करू. शिंद्यांच्या मते ईश्वरभक्ती यापेक्षा वेगळी नाही. म्हणून "आपण मनुष्यांमध्ये स्नेहसंबंधांचे वलय वाढवावे. मनुष्यावर प्रेम न करता मी ईश्वराचा भक्त होईन असे कोणासही म्हणविता येणार नाही. या करिता राजाने प्रजेवर, पतीने पत्नीवर, धन्याने चाकरावर प्रेम करावे व स्नेहसंबंध वाढवावा. त्याचे परिवर्तन ईश्वरभक्तीत होईल."

'मनुष्यसेवा आणि ईश्वरोपासना' या व्याख्यानात शिंद्यांनी मनुष्यसेवा हीच ईश्वरोपासना आहे. कारण श्रद्धेचे रूपांतर स्नेहात, स्नेहाचे रूपांतर सेवेत होणे गरजेचे आहे असे मत मांडले आहे. निष्कामपणे लोककल्याणासाठी मनुष्याची सेवा केल्यामुळे नवविधा भक्तीचे सर्व प्रकार मिळतात. सेवेमुळे अंगात विनम्रता बाणते. त्यामुळे मनाची अखंड शांती प्राप्त होते. केवळ ज्ञानाने, तर्काने, अनुभवाने वा श्रवणाने प्राप्त झालेली शांती केव्हाना केव्हा भंग पावते, पण सेवेमुळे होणारी शांती अखंड व निरामय असते. निंदा व स्तुती यांच्याकडे आपण लक्ष न देता सेवा करतो म्हणून आत्मपरीक्षणाच्या तीव्र कसोटीत हाच मार्ग उतरू शकतो. स्वत:च्या आप्तांच्या, जातीच्या व देशाच्या उत्कर्षासाठी झटणे हाही सेवाधर्मच होय. पण त्यामधील स्वत:चा मध्यबिंदू पुसून टाकून केवळ नि:स्वार्थपणे जर आम्ही सेवा करू तर ती अधिक श्रेष्ठ होईल. पुष्कळ लोकांचे आपण कल्याण करीत असू पण ते सर्व लोक आपले आहेत या भावनेने करीत असू तर त्याची किंमत एका मनुष्यावर नि:स्वार्थपणे केलेल्या उपकारापेक्षा कमी होईल. अनाथ विधवा, निराश्रित वृद्ध, तान्हे बाळ यांची नि:स्वार्थ बुद्धीने केलेली सेवा संग्रामात मिळविलेल्या विजयापेक्षा जास्त किंमतीची आहे.

आपल्या चौथ्या व्याख्यानात म. शिंदे यांनी परमार्थ मार्गात प्रसन्नता आणि मोक्षप्राप्ती यांची चर्चा केली आहे. त्यांच्या मते मनाची प्रसन्नता महत्त्वाची आहे. ते लिहितात, "मोक्षप्राप्ती म्हणजे काही दूरचा प्रसंग नव्हे. तो पदोपदी येणारा अनुभव आहे. मागे गेलेला किंवा नंतर येणारा काळ अथवा स्थिती नव्हे तर सर्व काळी, सर्व ठिकाणी मनाची प्रसन्नता असणे शक्य झाल्यावर प्राप्त होणारी ती दिशा आहे. मन प्रसन्न झाल्यावर जे सुख मिळते त्या सुखामध्ये आणि पारमार्थिक

सुखात कोणतेच अंतर नाही."

आपल्या पाचव्या आणि शेवटच्या व्याख्यानात आदर, स्नहेभाव, सेवा व प्रसन्नता ही चार प्रापंचिक साधने, प्रपंच आणि परमार्थ यांची एकवाक्यता कशी करायची याचा म. शिंदे यांनी विचार केला आहे. प्रपंच व परमार्थ यांत द्वैत नाही. संसार कोणालाच चुकलेला नाही. पण विज्ञानवादी आणि दैववादी लोकांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण चुकीचा आहे. विज्ञानवाद्यांना मोघम सत्यस्थापन करण्याची सवय लागलेली असते, तर दैववादी लोक पराधीनतेवर विश्वास ठेवतात. त्यांना स्वत्त्वाची आणि व्यक्तिस्वातंत्र्याची चाड नसते. तिसऱ्या प्रकारचे लोक वैतागी असतात. देशांतील व घरांतील कलहामुळे, अपमानामुळे त्यांची मने भंडावून गेलेली असतात. व्यक्तिस्वातंत्र्य त्यांना शिणास कारण वाटते. पण वैताग ही जीवनाची स्वाभाविक स्थिती असत नाही. संसारात कितीही हालअपेष्टा आल्या तरी आपल्यात जी साहजिक विनोदवृत्ती असते, तिला बाधा येऊ देऊ नये. लहान मुलांत उचंबळणारा आनंद, त्यांचा कौतुकी स्वभाव आणि साहजिक सहनशक्ती आपण होता होईतो कायम ठेवली पाहिजे. निदान आपल्या व्यक्तिविषयक वैतागाच्या आधारावर तत्त्वज्ञान रचू नये. म्हणून म. शिंदे यांचे असे मत होते की परमार्थ व प्रपंच यांत कोणतेही द्वंद्व नाही. बाह्यसृष्टी, भोवतालचा संसार व आपले मन ही सर्व ईश्वरमय आहेत, ईश्वराच्या वस्तीने ती क्षणोक्षणी पवित्र होत आहेत असे जाणून आम्ही सदैव नम्र आणि सुखी असले पाहिजे.

म. शिंदे यांनी आपल्या धर्मविचारात व्यक्तिस्वातंत्र्य व व्यक्तिविकास यांस महत्त्वाचे स्थान दिले. आता जे मत बुद्धीच्या कसोटीवर टिकत नाही ते लोकांना मान्य होत नाही. अशा मतांत जर काळाप्रमाणे बदल केला नाही तर तो समाज लयास जातो. व्यक्तिविकासात बुद्धीबरोबरच धर्माची भूमिका महत्त्वाची आहे. ईश्वर, विश्व व व्यक्ती यांच्यातील परस्परसंबंधाची धर्म चर्चा करतो. आधुनिक काळात स्वातंत्र्य व हक्क महत्त्वाचे मानले जातात. प्रत्येक मनुष्यास विचार करण्याचा, प्रेम करण्याचा आणि प्रयत्न करण्याचा अधिकार आहे. आपल्या शक्तीप्रमाणे शोध लावणे, विचार करणे आणि मनात आलेले विचार वाणीने आणि लेखणीने लोकांपर्यंत पोहोचवणे म्हणजे विचारस्वातंत्र्य होय. अंत:करणाच्या प्रवृत्तीप्रमाणे आपली आवडनिवड ठरविणे; अभिरुचीप्रमाणे उपभोग घेणे व प्रेमाचा विषय संपादन करणे म्हणजे प्रेमस्वातंत्र्य होय. आपल्या कर्तबगारीच्या जोरावर इष्ट पुरुषार्थाचे संपादन करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे वा प्रयत्नापासून विराम करणे हा माणसाच्या यत्न स्वातंत्र्याचा हक्क आहे. या तिन्ही हक्कांच्या

आड जरी सगळे जग आले तरी हे हक्क आपले नव्हेत असा कधी कोणी गैरसमज करून घेऊ नये. जे. एस. मिलने स्वातंत्र्याचा जो विचार मांडला होता त्याचाही म. शिंदे यांनी थोडक्यात परामर्श घेतला.

धर्माचा खरा अर्थ समाजाची सेवा करणे हा आहे. देव दूरस्थ आकाशात नसून ते समाजाचेच घटकावयव असतात. त्यामुळे निराकार समाजदैवताची संभावना करून ऋणमुक्तता करून घेणे हे प्रत्येकाचे कर्तव्य ठरते. आपली कर्मे पुरेशा गंभीरपणे व नैतिकतेने करणे, सेवा करून आनंदाने राहणे, बुद्धदेवाची शांतवृत्ती अंगी धारण करणे सर्व माणसांसाठी आवश्यक आहे. कर्मे करत असताना आपण गरीब आहोत, स्त्री आहोत, हीन जातीत जन्मात आलो आहोत ही भावना आपण मनात धारण करणे चुकीचे आहे. मनुष्य जन्माची सार्थकता माणसाच्या चित्तशुद्धीत आणि त्याच्या विकासात आहे. त्याचप्रमाणे ईश्वराशी तद्रूप होणाऱ्या प्रेममय शक्तीच्या परिपोषात आहे.

म. शिंदे यांचा अद्वैत वेदान्ताच्या तत्त्वज्ञानावर विश्वास नव्हता. प्रार्थना समाजाच्या मते ईश्वर मानवी रूप धारण करीत नाही. पण तो सर्व विश्व व्यापून असतो. तो हळूहळू विश्वात आपले मंगलमय आणि शक्तिशाली रूप उघडे करतो. म. शिंदे यांच्या मते व्यक्तीच्या स्वत्त्वाची पूर्ण वाढ झाल्यावर त्या प्रौढ व्यक्तीच्या जीवनात लहानमोठ्या घटना घडून येतात. त्यातून समाजाच्या आणि राष्ट्राच्या स्वत्त्वाची वाढ होते. व्यक्तीच्या वृद्धीस राजशासनाची पण गरज असते. या सर्वांचे उद्दिष्ट व्यक्तीच्या स्वत्त्वाचा विकास करणे आणि त्याद्वारा राष्ट्राच्या आणि विश्व समाजाच्या स्वत्त्वाचा विकास करणे हा आहे आणि या सामूहिक सत्वांतून पुन्हा व्यक्तीचे सत्त्व परंपरित करणे हा आहे.

अद्वैत वेदान्तात जीव व ब्रह्म यांच्यातील ऐक्याचे प्रतिपादन करण्यात आले आहे. शांकरप्रणीत वेदान्तात ब्रह्म सत्य व जगत् मिथ्या मानण्यात आले आहे. म. शिंदे यांच्यामते अद्वैत सिद्धान्तात जीवशिव यांचे ऐक्य कल्पिण्यात आले आहे पण मनुष्य ईश्वराशी एकरूप होऊ शकतो हे मत त्यांना मान्य नव्हते. त्याची कारणे खालील प्रमाणे :-

१) परमेश्वर इतका अनंत, सर्वज्ञ व श्रेष्ठ आहे की मर्त्य मानवाने त्याच्याशी तादात्म्य पावण्याची गोष्ट करणे उद्धटपणा आहे. २) विश्वाचे ज्ञान सतत वाढत आहे, वाढत जाणार आहे अशा काळात ब्रह्मवादाची स्थितिशील भूमिका घेणे म्हणजे वाढते ज्ञान नाकारणे आणि गतिशील जीवनाकडे पाठ फिरविणे होय. जे

आहे ते एकच तत्त्व आहे असे मान्य केले की नव्याचे स्वागत होत नाही. नित्य नवे जे शोध लागतात त्याची अद्वैतवादास किंमत नाही. व्यक्तीस येणाऱ्या एखाद्या ताज्या अनुभवाची किंमत शिळ्या अद्वैतवादापेक्षा जास्त आहे. ईश्वर ही शरीरविशिष्ट अवस्था नसून सर्व विश्वात व्यापून राहिलेली चैतन्यवादी अवस्था आहे. विश्वाच्या मुळाशी अज्ञात अशा शक्तींची प्रचंड अशी झटापट चालू आहे. तिला शिंदे vital impulse म्हणतात. ही चैतन्यशक्ती म्हणजे ईश्वर होय आणि विश्वचैतन्याचा शोध केवळ द्वैतानेच शक्य आहे. शिंदे लिहितात, ''परमेश्वर अनंत, आम्ही सांताहून सांत; तो सर्वज्ञ आम्ही अल्पज्ञ; तो सर्वसक्षम, सर्व समर्थ, आम्ही त्याच्या प्रेमास अपात्र; तो न्यायी, आमचे मन अन्यायाकडे धाव घेणार म्हणून आपण त्याच्यापासून वचकून राहिले पाहिजे, आपले अंत:करण शुद्ध राखले पाहिजे.'' आपल्या अपूर्णतेच्या जाणिवेमुळे आपल्या मनात विनय व नम्रता निर्माण होते. माणूस जीवनसाफल्य प्राप्त करण्यासाठी; उच्चतर नैतिक जीवन जगण्यासाठी प्रयत्न करतो.

म. वि. रा. शिंदे यांचा धर्मविचार हा प्रार्थना समाज व ब्राह्म समाज यांच्या धर्मविषयक विचारांवर पोसलेला असला तरी म. शिंदे यांनी त्याचा विकास केलेला आपणास दिसतो. ईश्वराची कल्पना त्यांनी सर्व विश्व व्यापणारी चेतन शक्ती या अर्थाने मान्य केली. या ईश्वराची उपासना व प्रार्थना त्यांना चित्तशुद्धीसाठी व आत्मोन्नतीसाठी महत्त्वाची वाटली पण त्यांची धर्मसाधना प्राधान्याने ऐहिक होती. इहलोकात ही धर्मसाधना कशी करावी याचाच त्यांनी प्रामुख्याने विचार केला. त्यांत आपल्या स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास, प्रखर नैतिक जाणीव, लोकांची सेवा, श्रद्धा, प्रेम, मनाची प्रसन्नता, सौंदयास्वादाची रसिकता आणि सर्वार्थाने मानवी जीवन संपन्न करण्यासाठी यत्न करण्याची भावना या गोष्टींचा समावेश होतो.

❑❑❑

प्रकरण सहावे

# धर्म आणि नीती

म. शिंदे यांच्या धर्मविषयक विचारांचा आढावा आपण मागील प्रकरणात घेतला. या प्रकरणात शिंदे यांच्या धर्म आणि नीतीविषयक विचारांचा आपण परामर्श घेणार आहोत. या प्रकरणाच्या पहिल्या भागात म. शिंदे यांच्या नीतीविषयक विचारांची आपण चर्चा करणार आहोत तर दुसऱ्या भागात प्रो. ऑयकन यांनी या विषयावर जे विवेचन केले आहे, त्याचा म. शिंदे यांनी आपणास परिचय करून दिला आहे. त्याचा पण आपण विचार करणार आहोत.

आपण आपल्या आतापर्यंतच्या विवेचनात पाहिले की म. शिंदे धर्म आणि नीती यांच्यातील संबंध जवळचा मानीत होते. मानवी व्यवहार व व्यक्तीचे विवेचन प्रखर अशा नैतिक जाणिवेने प्रेरित झाले पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यांना धर्म आणि नीती अभेद वाटत होते. त्यांच्या मते धर्म म्हणजे मानवी स्वभावातील उपजत गुण; ज्यांचा ओढा सत्याकडे असतो आणि नीती म्हणजे निरनिराळ्या उच्च मानवी आदर्शांच्या प्राप्तीसाठी केलेले प्रयत्न. त्यामुळे नीतीला ते धर्मातील सत्यशोधनाचे साधन मानीत असत. आपल्या व्यवहारात आपण नीतीला महत्त्व दिले पाहिजे आणि हा नैतिक व्यवहार व्यक्तीचे अधिकार, परस्परांमधील स्नेहसंबंध आणि व्यापक अशी मैत्रीची भावना यांवर आधारलेले असले पाहिजेत असे म. शिंदे यांचे मत होते. विचार करण्याचे, प्रेम करण्याचे आणि प्रयत्न करण्याचे माणसास स्वातंत्र्य आहे आणि त्या स्वातंत्र्याच्या आधारे माणसास आपला विकास करून घेता येईल असे त्यांचे सांगणे होते. म. शिंदे यांच्या दृष्टीने व्यक्तीचा वैयक्तिक विकास महत्त्वाचा आहे पण त्यापेक्षाही महत्त्वाचा समाजाचा विकास आहे. म. शिंदे यांच्या नीतीविषयक विचारांचे हे सूत्र होते.

आपल्या 'विनययोग', 'राजशासन', 'पितृशासन', 'क्षात्रधर्म', 'शासनयोग' आणि 'धर्म व व्यवहार' या निबंधांतून म. शिंदे यांनी आपले नीतीविषयक विचार

मांडलेले आपणास दिसतात.

म. शिंदे यांच्या मते धर्म हे मानवाच्या सर्व व्यवहाराच्या तळाशी व्यापून राहिलेले तत्त्व असून व्यवहारास सत्त्व प्रधान करण्याचे ते कार्य करते. या प्रमाणे सत्त्वानुसार अधिकाधिक उन्नत व्यवहाराला कारणीभूत होणारी अधिकाधिक खोल आणि विकसित वृत्ती हाच धर्माचा अर्थ. धर्म माणसास उच्च आदर्श काय आहेत हे सांगतो. मानवी जीवनातील सत्त्व काय आहे याची माहिती देतो आणि त्या ध्येयाच्या व सत्त्वाच्या प्राप्तीसाठी माणसाचा संघर्ष सुरू होतो. कारण नीतीचे ते आदर्श अंगी बाणवून घेण्याची माणसाची इच्छा असते.

हा जो संघर्ष चालू आहे त्याची परिणती मनाला संतोष देण्यात, त्यास प्रसन्नता प्राप्त करून देण्यात होते. भोवतालची परिस्थिती सदोष आहे म्हणून आपण निराश न होता निर्धाराने व आनंदी वृत्तीने त्यात बदल केला पाहिजे असे म. शिंदे यांचे मत होते. आपल्या मनामध्ये धीर ठेवणे व समाधान ठेवणे, आळसाचा त्याग करणे आणि विषयाचा त्याग करणे महत्त्वाचे. वैदिक काळात ऋषींनी धर्मप्राप्तीसाठी विषयनिवृत्तीचा पुरस्कार केला. नंतरच्या काळात भगवान श्रीकृष्णाने त्यास आत्मशुद्धीची जोड दिली. आज त्यास विचार आणि अनुभव यांची जोड मिळालेली आहे. आता केवळ माणूस व्यक्तिगत मुक्तीने किंवा पूर्णावस्थेने तृप्त होणार नाही. कारण व्यक्तीचे विचार व अनुभव सर्व मानवमात्रांच्या विचारात व अनुभवात मुरून गेले आहेत. त्यामुळे आता वैयक्तिक मोक्ष महत्त्वाचा नाही. पूर्णावस्था व्हावयाची आहे ती सर्व मानवजातीची व त्याद्वारे व्यक्तीचीही होत असते.

धर्म म्हणजे माणसाच्या क्षमतांचा जास्तीतजास्त विकास करणे होय. आज जगावर सरकार, संघटना, रूढी आणि पत या चार सत्तांचे राज्य चालू आहे. त्यातील पहिल्या दोन सत्तांचा संबंध राजकीय आणि धार्मिक सत्तांशी आहे. या सत्ता फार दिवसांपासून जगावर राज्य करीत आहेत. दुसऱ्या दोन सत्तांची जर योग्य अशी घटना तयार केली तर सर्वांचेच कल्याण होईल. शिंदे यांच्या मते सध्याचे युग लोकशाहीचे युग आहे. सरकारची सत्ता नीट चालली नाही तर तिच्यात दुरुस्ती करण्याचा लोकांना अधिकार आहे. पण सरकारबाबतचे हे स्वराज्य धर्मसंघटनांच्या बाबतीत लागू नाही. त्यामुळे त्या संस्थात धर्मगुरू, बडवे, महंत, पुरोहित यांची मनमानी चालते. हजारो, लाखो रुपयांची मालमत्ता त्यांच्या ताब्यात असते. त्यामुळे आता गरज धर्मसंस्थांच्या लोकशाहीकरणाची आहे. त्यातही आम्हास स्वराज्य हवे आहे. आजच्या काळात निकोप कार्य करणाऱ्या धर्मसंघटना

आपणास हव्या आहेत. त्यांच्याशिवाय समाजविकास शक्य नाही. कारण निकोप चालणाऱ्या धर्मसंस्थांपासून लोकशिक्षण, लोकसंग्रह, सांसारिक फायदे आणि आत्मिक संतोष यांचा लाभ होतो.

आपल्या नैतिक वर्तनात विनययोग महत्त्वाचा आहे. कारण त्यांतून खऱ्या अर्थाने शीलवृद्धी होते, मैत्रीची भावना सर्वत्र पसरते.

आपल्या 'शासनयोग' या भाषणात म. शिंदे यांनी मनुष्यांच्या परस्परसंबंधाबाबत चर्चा केली आहे. शासनयोगात माणसांतील व्यवहारांचे नियमन व नियंत्रण कसे करावे याचा विचार केला जातो. शासनयोगाचे दोन प्रकार आहेत. पहिल्या प्रकारच्या शासनयोगाचा पुरस्कार करणारे लोक कायदा, नियम आणि सनद यांच्या आधारे माणसाने आपले वर्तन करावे असे सांगतात. दुसऱ्या पक्षाचे लोक कायदा, नियम व सनद स्वामीचे किंवा राजाचे दान आहे असे समजतात. पण या सनदपक्षापेक्षा आणि स्वामीपक्षापेक्षा वेगळा तिसरा पक्ष आहे. तो पक्ष आहे अंत:प्रामाण्याचा. आपले वर्तन केवळ सनद वा कायदा यांच्यावर आधारलेले राहणार नाही. ते राजाच्या एकमुखी आज्ञेवरही अवलंबून राहणार नाही, तर त्याबाबतचा अंतिम निर्णय आपल्या अंत:करणातील विवेकाच्या आधारे केला जाईल. म. शिंदे यांच्या मते प्रख्यात जर्मन तत्त्वज्ञ कांट यालाच Categorical imperative असे म्हणतो. समाजात पितृशासन, गुरुशासन व राजशासन असते आणि समाजाच्या एकूण विकासात काही प्रमाणात या शासनांची गरजही असते. कारण या योगाबरोबरच माणसाच्या कर्तव्यबुद्धीची वाढ होते. मात्र जे शासन करतात त्यांनी विनयशील होणे गरजेचे आहे. म. शिंदे लिहितात, "मनुष्याने शासनाचा अधिकार आपणाकडे घेण्यापूर्वी स्वत: विनयसंपन्न झाले पाहिजे. राजसी शासनातून सात्त्विक शासनाचा जो विकास होतो तो शासनाच्या विनयामुळेच होतो. त्यामुळे शासनकर्त्याने मग तो राजा, पिता वा गुरू असो आधी विनययोगात सिद्धी मिळविलीच पाहिजे. आपल्या वर्तनात सत्याची बाजू राखणे अवघड असले तरी गरजेचे आहे." ते लिहितात, "बहुमताचा एवढा प्रचंड प्रभाव आहे की ते ज्यास सुदैवाने अनुकूल होते त्याच्या मूर्ती मंदिरोमंदिरी स्थापल्या जातात. पण दुर्दैवाने तेच बहुमत ज्याला प्रतिकूल होईल त्यास चव्हाट्यावर सुळावर चढावे लागते. एवढा मोठा प्रभाव असूनही त्या बहुमतास प्रमाण न मानता सत्य व असत्याचा शोध करावयाचा असल्यास शोधकांनी आपले मनच ग्वाही ठेवावे असे तुकाराम सांगतात ते आम्हास मान्य केले पाहिजे."

आपल्या 'स्वराज्य व स्वाराज्य' या प्रसिद्ध लेखात म. शिंद्यांनी या दोन

संकल्पनांतील भेद स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते स्वराज्य, स्वत:चे राज्य ज्यास आपण लोकशाही राज्य म्हणू आणि 'स्वाराज्य' म्हणजे ईश्वरी राज्य किंवा देवाचे राज्य. लोकशाही राज्याची कल्पना ऐहिक आहे पण ती अपूर्ण आहे. इंग्लंड-अमेरिकेतही लोकसत्ताक स्वराज्य पूर्णपणे जमलेले नाही. कारण इंग्लंडमध्ये स्त्रियांना व गरिबांना पार्लमेंटात जाता येत नाही. अमेरिकेत तर स्त्रियांबरोबर गरिबांना आणि नीग्रोंना पार्लमेंटात जाण्यास मज्जाव आहे! स्वाराज्याची कल्पना रामराज्याच्या वा 'युटोपिया'च्या जवळची. स्वाराज्याची कल्पना आदर्श राज्याची. एका समाजात सर्वांस समान हक्क असावेत, कोणाशी कोणाचे वैर असू नये. आपण सगळे बंधू-भगिनी. संपत्ती सर्वांच्या मालकीची. राजाही नाही आणि राज्यही नाही. सध्या या कल्पनेप्रमाणे समाज स्थापन झालेला नाही पण माणूस सतत स्वराज्याचे रूपांतर स्वाराज्यात करण्याचा प्रयत्न करीत असतो, याची सुरुवात म्हणून प्रत्येक व्यक्तीने आपल्या स्वत:वर राज्य स्थापन केले पाहिजे. अशा प्रकारच्या स्वराज्याचा व स्वाराज्याचा अनुभव साधू-संत सनातन काळापासून घेत आले आहेत.

धर्म व नीती यावर प्रो. ऑयकन यांनी विचार मांडले. म. शिंद्यांनी प्रो. ऑयकन यांच्या जीवनमीमांसेच्या संदर्भात 'सुबोधपत्रिके'त लेख लिहिले. त्यात म. शिंदे यांचे स्वत:चे विचार कोणते आणि प्रो. ऑयकन यांचे स्वत:चे विचार कोणते यात स्पष्टता नाही. मात्र प्रो. ऑयकन यांच्या विचारांना त्यांची मान्यता होती ही गोष्ट स्पष्ट दिसते.

सुरुवातीस धर्म या विषयावर म. शिंदे यांनी मतप्रदर्शन केले आहे. त्यांच्या सांगण्याप्रमाणे हल्लीच्या काळात धर्माबाबत अनेक प्रकारचे मतप्रवाह आहेत. पहिल्या मतप्रवाहाचा धर्मकल्पनेसच विरोध आहे. त्यांच्या मते आपले जीवन सुखात व प्रामाणिकपणे जगण्यासाठी धर्माचा सर्वस्वी त्याग करणे गरजेचे आहे. कारण धर्मकल्पना अगदी जुन्या काळात निर्माण झालेली, आमची मती भ्रांत करून बुद्धिभेद वाढविणारी बाब आहे. त्यामुळे माणसामाणसांत द्वेषभाव निर्माण होतो. माणसाची यत्नशक्ती कुंठित होते. म्हणून धर्म नको. दुसऱ्या पक्षाचे असे मत आहे की समाजाच्या गरजा भागविण्यासाठी आणि समाजातील गोंधळ व बेदिली दूर करण्यासाठी धर्माची अत्यंत गरज असते. कारण व्यक्तीची उन्नती करणारी व अखिल मानवजातीचे अंतस्थ ऐक्य जागवणारी, मानवी जीविताचे रहस्य उलगडून दाखविणारी आणि अनंत व सनातन वस्तूशी जीवनाचा संबंध जोडणारी धर्म ही एकमेव बाब आहे.

हे जे वर सांगितलेले दोन पक्ष आहेत त्या दोन्हींच्या प्रतिपादनात सत्याचा काही अंश आहे. दोन्ही पक्षाच्या अभिमानाचा डाग न लागू देता त्यांची समीक्षा करणे हे तत्त्वज्ञानाचे कार्य आहे. जुन्या काळात निसर्गातील अदृश्य व निसर्गातीत शक्तीच्या संदर्भात धर्माचे चिंतन झाले. आता आधुनिक वैज्ञानिक प्रगतीमुळे भौतिक जग महत्त्वाचे बनले आहे. त्यातूनच दैवी अतींद्रिय शक्तीबाबतचा आदरभाव कमी झाला. माणसांच्या मनात अज्ञेयवादी विचारांची वाढ झाली. माणसांच्या मनात निसर्गावर अंमल प्रस्थापित करण्याची लालसा वाढली. आपण विश्वाचे केंद्रबिंदू आहोत या धर्मविकासाच्या केंद्रवर्ती असणाऱ्या सिद्धान्तास आव्हान मिळत असून ख्रिस्ती धर्मासारख्या धर्माबाबत लोकांच्या मनात फारसा आदर राहिलेला नाही. मानवी जीविताच्या केंद्रस्थळी असणाऱ्या धर्माचे उच्चाटन होत असून धर्म ही स्वत:सिद्ध बाब आहे या समजुतीने मानवी जीवनाला पूर्वी जे स्वास्थ्य व सुरक्षितता लाभली होती ती आता नष्ट झाली आहे. त्यामुळे आधुनिक विचारी माणसाच्या मनातील धर्मबुद्धीचा झरा आटत चालला आहे. धर्माच्या निर्जीव चालीरीती कायम राहत आहेत आणि त्याचे विकृत रूप लोकांसमोर येत आहे.

पण धर्माचा निषेध केल्यामुळे आपल्या जीवनातील समस्या कमी होत नाहीत. कारण धर्माचा पाया डळमळल्यानंतर ज्या गोष्टी माणसास टाकाव्या वाटत नाहीत त्याही डळमळल्या जातात. कारण अजून तरी सत्याच्या खोल पायाशी मनुष्याचा संबंध धर्मामुळेच जोडलेला आहे. धर्मामुळेच माणसास विशिष्ट आदर्शांचा लाभ झाला आहे. धर्माशिवाय जीविताची पुनर्घटना करता येत नाही. त्याशिवाय मनोवृत्तीचा तोल आणि विवेकाचा नि:पक्षपातीपणा नष्ट होतो. मानवी जीविताचा विश्वाशी अंतर्बाह्य संबंध तोडून टाकल्यानंतर मागे थोडे अवशेष उरतात.

धर्माचा विरोध करणाऱ्या पक्षाच्या मताचा जरी आपण स्वीकार केला नाही तरी आपणास आपल्या धर्मसाधनेत बदल घडवून आणणे आवश्यक आहे. कारण समाजात व जगात होण्याऱ्या सर्व घडामोडी लक्षात घेऊनच आपणास त्यांचा धर्माशी समेट करावा लागतो. सर्व काळी लागू असणारा सनातन धर्म आणि विशिष्ट काळात व युगात लागू असणारा युगधर्म यांत आपणास समेट करावा लागतो. मधल्या काळात भिन्न मतांची व धर्माची उभारणी होत आहे. पण ही उभारणी गतकाळाच्या अनुरोधाने न होता आजच्या काळास योग्य होईल या दृष्टीने करणे गरजेचे आहे. जगाचा आपणास जो जो अनुभव येतो त्या त्या

प्रकारची चिकित्सा करणे एवढेच तत्त्वज्ञानाचे कार्य नसून धर्मविषयाचे विवेचन करून त्यासंबंधी काही विधानपूर्वक सिद्धान्त ठरवणे हेही तत्त्वज्ञानाचे कार्य आहे. म. शिंदे यांच्या मते प्रो. ऑयकन यांच्या जीवनमीमांसे मध्ये ब्रह्मवादास अग्रस्थान देण्यात आलेले आहे. म्हणूनच धर्माचे सत्यत्वसिद्ध करण्यासाठी इतिहासाचा आधार घेण्याची गरज नाही. स्वतंत्र रीतीनेही त्याचे सत्यत्व सिद्ध झाले आहे.

प्रो. ऑयकन यांच्या मते जे अनुभव सार्वत्रिक आहेत, ज्यांचा आपल्या जीवनाशी संबंध पोहोचतो आणि ज्यांचा साक्षात्कार आपणापैकी प्रत्येकास प्रत्यक्षरूपी होणे संभव असते असेच अनुभव हे धर्माचे विषय असतात. ज्याचा आमच्या अंत:करणात स्वयंभू साक्षात्कार होतो त्यास शिंदे यांनी ब्रह्मवाद नाव दिले. आध्यात्मिक जीवनाच्या कसोटीवर ख्रिश्चन धर्म चांगला उतरतो कारण तो उद्धार करणारा धर्म आहे. जुन्या जगातून निघून नव्या धर्माचा स्वीकार करावा असे तो सांगतो. जगात जे वाईट आहे ते हिंदू धर्मात सांगितल्याप्रमाणे माया नसून तो नैतिक गुन्हा आहे आणि त्या गुन्ह्यामुळे जगात अव्यवस्था निर्माण होते. पण जगाचा त्याग करणे हा त्यावरचा उपाय नाही. आपणास मानवी जीवनाचे पुनर्घटन करावे लागते. पण हे पुर्नघटन केवळ प्रबोधनाच्या आधारावर होणार नाही. पुनर्घटनासाठी आमूलाग्र नैतिक परिवर्तन करणे गरजेचे आहे. ख्रिस्ती धर्माप्रमाणे देव व मनुष्य यांमध्ये पूर्ण ऐक्य आहे आणि ते ऐक्य मानवी जीवनात दिसून येते. या ऐक्यापासूनच धर्माला शुद्ध व आध्यात्मिक स्वरूप प्राप्त होईल.

सध्या धर्म व आधुनिक संस्कृती यांत मोठा लढा सुरू आहे. प्रो. ऑयकन यांच्या मते या लढ्यात ख्रिस्ती धर्माने स्वत:मध्ये सुधारणा घडवून आणल्याशिवाय यश मिळणार नाही. त्यांनी ख्रिस्ती धर्माची सुधारणा करण्यासाठी खालील उपाय सुचविले आहेत.

१. जुन्या ख्रिस्ती धर्मातील जगाविषयीची कल्पना निराधार आहे. नव्या-जुन्याची तडजोड न करता नव्यामध्ये जे सत्य आहे त्याचा आपण स्वीकार केला पाहिजे.

२. सांप्रदायिक धर्माची विधाने टाकून देऊन आध्यात्मिक जीवनाचा पाया स्वानुभवावर रचला पाहिजे.

३. जुना ख्रिस्ती धर्म निषेधपर व निराशावादी आहे पापमोचनाकडे त्याची दृष्टी आहे. त्यामुळे मनुष्य जीवनाच्या शुभाकडे कशी प्रगती करीत आहे, याकडे त्यांचे दुर्लक्ष होते. त्यामुळे आनंदवादाचा त्यास आस्वाद घेता येत नाही.

मनुष्यास स्वतंत्र व स्वयंप्रेरित कर्तृत्वशक्ती प्राप्त करून देण्यास जुना धर्म असमर्थ आहे. प्रो. ऑयकन यांच्या मते कर्तृत्वशक्ती आणि आनंदवाद यांतील परस्परसंबंध आपण लक्षात घेणे गरजेचे आहे. धार्मिक बाबतीत आम्हास अप्रामाणिकपणा टाळायचा असेल, आम्हास आध्यात्मिक निरामय साधायचे असेल तर या प्रकारच्या सम्यक ज्ञानाची गरज आहे.

प्रो. ऑयकन यांच्या मते नीतीचा प्रांत पण धर्मासारखाच वादग्रस्त आहे. अखिल जीवनाचे समष्टिरूप व अंतिम सत्यासंबंधी आमच्या भावना दृढ झाल्याशिवाय नीतितत्त्वांचा पायाच नव्हे तर त्यांची नुसती विशद कल्पनादेखील स्थिर राहू शकत नाही. नीती हे संचित आणि क्रियमाण यांचे जाळेच असते. शिंदे यांनी नीतीचे पाच प्रकार सांगितले आहेत. ते म्हणजे १) धार्मिक नीती २) संस्कृतीची नीती ३) सामाजिक नीती ४) शुद्ध बुद्धीची नीती आणि ५) व्यक्तीविषयक नीती.

शिंदे यांच्या मते धार्मिक नीती म्हणजे अशी नीती ज्यात आमची संकल्पशक्ती व आमची भावी प्रगती दैवावर अवलंबून ठेवण्यात येतात. त्यामुळे मनुष्याच्या आध्यात्मिक स्वातंत्र्यास धोका पोहोचतो. मनुष्य केवळ सहनशील बनतो. दीन धर्मावर आधारलेल्या नीतीची शक्ती व संसारनियामकता काही प्रमाणात क्षीण होतात. २) संस्कृतीच्या नीतीमध्ये सर्व रोख मानवी प्रगतीचा वेग वाढविण्याकडे असतो. त्यामुळे त्यात आंतरिक विकासाकडे दुर्लक्ष होते व बाह्य समारंभ आणि बाह्यसृष्टी यांनाच फाजील महत्त्व मिळते. सामाजिक नीतीत सामाजिक हित जास्त महत्त्वाचे ठरते. एकंदर जीवित समष्टीची प्रमाणबद्धता कमी होते. जीविताच्या वरपांगी सुधारणांचे स्तोम माजविले जाऊन जीविताच्या रहस्याची अधोगती व अवनतो होते. शुद्ध बुद्धीची नीती केवळ विचारजन्य असते. त्यामुळे माणसास आंतरिक स्वातंत्र्य मिळते पण तिचे स्वरूप केवळ भावमय असते. व्यक्तिविषयक नीतीचा प्रकार काही विशिष्ट रमणीय आत्म्याच्या ठायी दिसून येतो. आपल्या क्षमतांचा व सामर्थ्याचा व्यक्ती पूर्ण विकास घडवून आणते पण अशा व्यक्ती संख्येने कमी असतात. समाजाला त्यांचे अनुकरण करता येत नाही. नीतीच्या या वेगवेगळ्या प्रकारांमुळे समाजात द्वैत व भेद वाढत आहेत. या परिस्थितीतून सुटका करून घेण्यासाठी आपल्या आंतरजीवनात नवी नीती निर्माण केली पाहिजे. त्यासाठी जगातील अज्ञान व अशुभ यांच्याशी संघर्ष करावे लागतील. मानवी आत्मा म्हणजे कोणी बाहेरचा साक्षीदार नसून या विश्वरचनेच्या महत्कार्यात तो साह्यकारी आहे हे सत्य अनुभवण्यासाठी अविद्येविरुद्ध संघर्ष केला पाहिजे. मानवी स्वभावाचे जे नैतिक स्वरूप आहे त्यावर ज्या ज्या गोष्टींचे म्हणून झाकण

पडेल त्या सर्वास अविद्या हे नाव आहे. तिच्या प्रभावामुळे मनुष्य लघुता व हीनता पावतो. त्यामुळे आपल्या विवेकाच्या मदतीने नीतीच्या नव्या शोधाला लागणे गरजेचे आहे.

प्रो. ऑयकन यांच्या मते नीती म्हणून काही निराळा स्वयंपूर्ण पदार्थ नव्हे. जीवनाचे समूहरूपी ज्ञान झाल्याशिवाय खऱ्या नीतीचा उदय होत नाही. मनुष्य ज्या वेळी स्वसंवेद्य, स्वयंप्रेरित आणि स्वतंत्र होतो तेव्हा त्याचा नीती हा मध्यबिंदू बनतो. या अवाढव्य संसारात नीती ही बाहेरून मिळालेली देणगी नसून तीं माणसाच्या जीवनविकासातील एक अवस्था आहे. मानवी नीतीचा पाया आध्यात्मिक जीवनात खोलवर रोवणे गरजेचे आहे. मग इतक्या खोल पायावर उभ्या असणाऱ्या नीतीचा प्रभाव जीवनातील सर्व व्यवहारांवर होणे अपरिहार्य ठरते.

सत्य, कला आणि सौंदर्य ह्या बाह्य गोष्टी नसून त्या आपल्या अंतर्जीवनाचा भाग आहेत. याची प्रतीती येणे गरजेचे आहे. जीवन याप्रमाणे ज्या वेळी द्वंद्वातीत होते तेव्हा बाह्य विषयातही आत्मा आहे हे कळून चुकते. आपण इतिहासात डोकावून पाहिले असताना आपणास हे स्पष्ट दिसते की जेव्हा नीती ही आध्यात्मिक जीवनाच्या मध्यबिंदूवर नव्हती तेव्हा ती शुष्क व पोकळ झाली होती. अंत:करणात जर नीतीचे अधिष्ठान नसेल तर बाहेरची बंडे व कलह यशस्वी होतील. पण अंत:करणात जर नीतीचे अधिष्ठान असेल तर तेथे स्वराज्य नांदायला लागेल. म्हणून प्रो. आयकन यांच्या मते आमच्या सर्व शक्तींचा विकास करणे व मानवी जीवन चैतन्यशील करणे हाच नीतीचा उद्देश आहे. मानवी व्यक्तिमत्त्वाचा व स्वातंत्र्याचा विकास समाजाचे या नीतितत्त्वांच्या आधारे पुनर्घटन करणे यात आजचा नीतिधर्म सामावलेला आहे.

विज्ञान व तत्त्वज्ञान व संसार व तत्त्वज्ञान यांच्यातील निकट संबंधाचा प्रा. ऑयकन यांनी पुरस्कार केला. विज्ञानाच्या विकासामुळे आमचा दृश्य विश्वाशी जवळचा संबंध आला. या विकासामुळे आपले वर्चस्व मानवविद्येवर स्थापन करण्याची विज्ञानाची लालसा आहे. विज्ञान बाह्य गोष्टींचा अभ्यास करील पण त्यांस अंत:सृष्टीचे ज्ञान होणार नाही, असे प्रो. ऑयकन यांचे याबाबतचे मत आहे.

म. शिंदे यांनी धर्म, नीती, विज्ञान व तत्त्वज्ञान यांच्या संबंधात प्रो. ऑयकन यांनी जी मीमांसा केली आहे त्याचा आपणास थोडक्यात परिचय करून दिला. त्यांच्या विचारांवर शिंदे यांनी स्वत:चे भाष्य केलेले नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे प्रो. ऑयकन यांचे विचार व म. शिंदे यांचे विचार यांमध्ये मोठ्या प्रमाणात

साधर्म्य होते हे आहे.

या प्रकरणात आपण म. शिंदे यांचे धर्म आणि नीती यासंबंधीच्या विचारांचे विवेचन केले. याबाबत शिंद्यांच्या विचारांचा मुख्य रोख हा ऐहिक जीवनातील व्यक्ती व समाज यांच्या विकासावर केंद्रित झालेला आपणास दिसतो. विज्ञान, कला, साहित्य आणि सौंदर्य यांच्या विकासात व त्या विकासाची मानवी जीवनात जी प्रतीती येते त्या प्रतीतीत धर्म व नीती यांचे साफल्य सामावलेले आहे असे शिंदे यांचे सांगणे होते. ऐहिक जीवनात नैतिकतेने वागल्यानंतर, स्वातंत्र्याचा व हक्कांचा विकास केल्यानंतर आणि लोकसेवा, लोकशिक्षण आणि लोकसंग्रह केल्यानंतर आपण आपले जीवन सफल झाले असे मानतो. परलोकातील मोक्षापेक्षा इहलोकातील हे जीवनसार्थक्य म. शिंदे यांना जास्त महत्त्वाचे वाटत होते.

❑❑❑

प्रकरण सातवे

# म. वि. रा. शिंदे यांचे धर्मविषयक विचार चिकित्सक अभ्यास

म. वि. रा. शिंदे यांच्या धर्मविषयक विचारांचा आपण येथे थोडक्यात आढावा घेतला. म. शिंदे यांचा धर्मविषयक दृष्टिकोण हा अन्वय दृष्टिकोण होता, शांकरमतानुयांप्रमाणे तो व्यक्तिरेक दृष्टिकोण नव्हता. त्यामुळे त्यांचा जीवन, राजकारण, नीती आणि धर्म यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण जास्त उदार, सहिष्णू व व्यापक बनला. ब्राह्म समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज आणि युरोपातील उदार धर्माचे जे प्रभाव होते त्या प्रभावांना आत्मसात करावयास तो उपयुक्त ठरला. धर्मसाधना करीत असताना रानडे, फुले आणि रॉय यांच्या धर्मविषयक विचारांना नवा आशय आणि आकार देण्याचे कार्य म. शिंदे यांनी केले.

म. शिंदे यांच्या जीवनात धर्म महत्त्वाची भूमिका बजावत होता. त्यांच्या मते भारताची नव्याने उभारणी करणे हे मोठे धर्मकार्य होते. भारतात अनेक राष्ट्रवजा मोठे प्रांत आहेत, त्यांत वेगवेगळ्या भाषा बोलणारे लोक आहेत. या सर्व भारतीयांना एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेमध्ये समरस करणे हेसुद्धा धर्मकार्यच आहे अशी म. शिंदे यांची भावना होती. भारतात उदार धर्माच्या आचरणातून खऱ्या अर्थाने स्वतंत्र आणि स्वायत्त असा नागरी समाज निर्माण होईल आणि हा नागरी समाज भारतीय राष्ट्राची जडणघडण करील असे त्यांचे मत होते.

म. शिंदे यांनी ब्राह्म समाज आणि प्रार्थना समाजाच्या द्वारा उदार धर्माचे विचार समाजात पसरविण्याचे कार्य केले. त्या कार्यास लोकाभिमुख दिशा देण्याचा त्यांचा प्रयत्न होता. अस्पृश्य व दलित समाजांत कार्य करण्याचा निर्णय त्यांनी याच भावनेतून घेतला. प्रार्थना समाजासारख्या संस्थांचे कार्य बहुजन समाजापर्यंत पोहोचत नाही, त्यामुळे बहुजन समाजाची धर्मजिज्ञासा पूर्ण होत नाही. त्यांस उच्चतर जीवनाचे नैतिक आदर्श आणि एकेश्वरी उपासनेचे प्रकार माहीत होत

नाहीत याबद्दल त्यांना खंत वाटत होती. प्रार्थना समाजाप्रमाणेच सत्यशोधक समाजाचे कार्य एकदेशीय राहिले. त्यामुळे तो बहुजन समाजात पसरलेला असूनही सत्यशोधक समाजाने बहुजन समाजाची धर्मजिज्ञासा तृप्त केली नाही. त्यामुळे बहुजन समाजाचे आंतरिक जीवन विकसित होऊ शकले नाही. ते शुष्क राहिले.

म. शिंदे यांनी ब्राह्म समाजाचे व प्रार्थना समाजाचे विचार समाजात पसरविण्याचे कार्य केले. हे काम करीत असताना प्रार्थना समाजाच्या वर्गीय वा वर्गजातीय स्वरूपाची त्यांना जाणीव झाली होती. वायकोम सत्याग्रहाच्या वेळी मँगलोर ब्राह्म समाजाचे स्वरूपही त्यांच्या लक्षात आले होते. वर्ग व जात यांतून निर्माण झालेले हे वैमनस्य केवळ प्रबोधनाच्या मार्गे दूर होणार नाही यांची म. शिंदे यांना जाणीव होती. आपल्या मानवी अधिकारांची तीव्र जाणीव जोतीबांनी समाजातील सर्व वर्गांना करून दिली पण केवळ वैमनस्य व संघर्ष यावर आधारलेला सत्यशोधक समाजाचा मार्ग अभिजनांतील स्पर्धा तीव्र करील पण त्यामागे या प्रश्नाचे निराकरण होणार नाही असे म. शिंदे यांचे मत होते. त्यामुळेच राजकारणात त्यांचे राजर्षी शाहू, ब्राह्मणेतर पक्ष व डॉ. आंबेडकर यांच्याशी जमले नाही. हा प्रश्न सोडविण्यासाठी म्हणूनच म. शिंदे यांनी राष्ट्रीय चळवळीचा व म. गांधींचा आधार घेतला. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या नेत्यांना काँग्रेस पक्षात सामील होण्यास प्रवृत्त केले. शेतकऱ्यांच्या चळवळी वर्गीय आधारांवर उभ्या केल्या. पण आज गांधी-नेहरूंची काँग्रेस शेतकऱ्यांना पाठिंबा देते आहे म्हणून ती हमेशाच त्यांना पाठिंबा देईल असे नव्हे असे म्हणून शेतकऱ्यांना अधिकारांबाबत जागृत राहावयास त्यांनी सांगितले.

भारतातील भागवत धर्माच्या विकासाचा म. शिंदे यांनी ऐतिहासिक दृष्टिकोणांतून आढावा घेतला. या विकासामागे कार्यरत असणाऱ्या सामाजिक शक्ती व मूल्यांचे विस्ताराने विवेचन केले. भागवत धर्म ही व्यापक, सहिष्णू आणि प्रागतिक चळवळ होती. तिने ओंगळ श्रौत परंपरेला आणि कर्मठ पूर्वमीमांसा परंपरेला विरोध करून शुद्ध भक्तिमार्गाचा व समताधिष्ठित विचारांचा प्रचार व प्रसार केला. भागवत धर्माचे मूळ वेदात नसून ते भारतातील वेदपूर्व संस्कृतीत दडलेले आहे हे त्यांनी स्पष्ट करून दाखविले. त्याचप्रमाणे शैव, शाक्त, वैष्णव, बौद्ध व जैन भागवत धर्माचे स्वरूप त्यांनी स्पष्ट केले. दक्षिण भारतातील अलवार संतांच्या कार्याचा त्यांनी मोठ्या गौरवाने उल्लेख केला. बौद्ध व जैन हे धर्म सुधारणावादी आणि समतावादी भागवत धर्माचेच आविष्कार आहेत, असे त्यांचे मत होते. भागवत धर्म व इतर धर्म संप्रदायात होत असलेल्या आंतरक्रियांची व परस्पर प्रभावांची,

त्यामागे कार्य करणाऱ्या शक्तींची त्यांना चांगली माहिती होती. शिंद्यांनी उत्तर भारतातील संत परंपरा, रामानंद कबीर, चैतन्य संप्रदाय आणि शीख धर्म यांचीही या संदर्भात चर्चा केली. पण उत्तर भारतातील भागवत धर्माच्या पुनरुज्जीवनास सुफी संतांनी केलेल्या योगदानाचा म. शिंदे यांनी उल्लेख केला नाही. कदाचित त्या काळात त्यांना त्याबाबतची माहिती तेवढ्या प्रमाणात उपलब्ध झाली नसेल. तरीही त्यांची शीख पंथावर पडलेल्या इस्लामच्या प्रभावाची नोंद घेतली आहे. पण याबाबतीत म. शिंदे यांनी जी अभ्यासाची पद्धत आणि शिस्त घालून दिली तिचा विकास पुढे झाला नाही. १९६० नंतर भारतात झालेल्या मार्क्सवादी इतिहासकारांचे या विषयावरील लिखाण वाचताना आपणास पदोपदी म. शिंदे यांच्या विवेचनाची आठवण येते यावरून त्यांच्या लिखाणाचे मोल कळावे.

म. शिंदे यांनी भागवत धर्माची व्यापक अशी व्याख्या करून कट्टर धार्मिकता वेडगळ विधी व निषेध, जातीय विषमता व वर्णश्रेष्ठत्त्वाचा अहंकार यांचा विरोध करणाऱ्या सर्व शक्तींचा भागवत धर्मामध्ये समावेश केला. या सर्व पंथांना व धर्मांना समान असणाऱ्या सकारात्मक बाजूंचा त्यांनी उल्लेख केला. पण नंतर शैव, शाक्त व तंत्र यांत जे वामाचार निर्माण झाले व त्याविरुद्ध संघर्ष करणारे जे सुधारक निर्माण झाले त्यांच्याही कार्याची नोंद म. शिंदे यांनी घेतली. भक्ती चळवळीने भारतीय समाजाच्या लोकशाहीकरणात महत्त्वाची भूमिका बजावली आणि अठरा पगड जातींत जन्मास आलेल्या संतांना तिने आत्माविष्कार करण्याची संधी दिली. पण भारतातील जातिव्यवस्था विशिष्ट अशा सरंजामदारी आर्थिक व सामाजिक पायावर उभी असल्यामुळे तिचा पाडाव करणे भागवत धर्मास शक्य झाले नाही. पण त्यातील विषमता, अन्याय कमी करून विकासाची वाट मोकळी करून देण्यात संतांनी मोठेच काम केले हे आपणास विसरता येणार नाही. गेल्या ६० ते ७० वर्षांत या विषयावर बरीच नवी माहिती आता उपलब्ध झाली आहे. म्हणून नव्या संदर्भात व म. शिंदे यांची तौलनिक अभ्यासाची परंपरा कायम ठेवत या विषयाची जास्त विस्ताराने मांडणी करणे गरजेचे आहे.

म. शिंदे यांनी धर्मकल्पनेची व्यापक सामाजिक संदर्भात मांडणी केली. त्याच्या धर्मविचारांवर प्रार्थना समाज व ब्राह्म समाज यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्याच प्रमाणे उदार धर्मामागील मूलतत्त्वे त्यांनी आत्मसात केली होती. त्यांचा एकमेकाद्वितीय परमेश्वराच्या अस्तित्वावर विश्वास होता. पण ते अद्वैत वेदान्ताचे पुरस्कर्ते नव्हते. त्यांच्या मते तत्त्वज्ञानाच्या आधारानेच माणूस सत्याचा शोध घेऊ शकतो. अद्वैत वेदान्तविचारांतून स्थितिशीलता प्रभावी होते. ईश्वर हा

सत्याचे व नीतीचे निधान आहे. आपल्या धर्मजाणिवेच्या पाठीमागे ईश्वराच्या अनंतत्वाची व आपल्या सांतत्त्वाची भावना महत्त्वाची असते. ईश्वराच्या सांनिध्यात आपले अंतर्याम शुद्ध राखणे, आपले मन स्नेह व प्रेम यांनी प्रेरित करणे आणि विचार व यत्न स्वातंत्र्याचा वापर करून आपला व पर्यायाने जगाचा विकास करणे हे आपले कर्तव्य आहे. म. शिंदे यांनी स्वर्ग व नरक यांना महत्त्व दिले नाही. त्यांनी संन्यास, निवृत्ती व मुक्तीची गूढवादी कल्पना यांना महत्त्व दिले नाही. कारण त्यांच्या धर्मसाधनेत इहलोकातील आपली कर्तव्ये त्यांनी महत्त्वाची मानली होती. न्या. रानडे यांनी नागरिकत्वाचा विकास हे धर्माचे महत्त्वाचे कार्य मानले. सार्वजनिक सत्यधर्मात या नागरिकत्त्वाच्या गुणांचा विकास कसा करता येईल याचे विवेचन म. फुले यांनी केले. म. शिंदे यांनी माणसाच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासात धर्म महत्त्वाचा मानला कारण आपल्या अंत:साधनेतून माणूस स्वत:ची चित्तशुद्धी करून घेतो. बाह्य साधनेच्या द्वारा समाजातील सर्व लोकांची सेवाशुश्रूषा करणे; अखिल मानव जातीबद्दल बंधुभाव व सख्यभाव बाळगणे, आपल्याजवळ जे काही गुण आहेत किंवा वस्तू आहेत त्यांचा लाभ इतरांना करून देणे; स्वातंत्र्याचा व अधिकारांचा उपभोग घेणे इत्यादी गोष्टींचा समावेश त्यांनी त्यांच्या धर्मसाधनेत केला होता.

त्यांच्या धर्मसाधनेत स्वातंत्र्याची व हक्काची कल्पना महत्त्वाची होती. त्यात विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्यांचा हक्क, प्रेम करण्याचा हक्क व यत्न करण्याचा हक्क यांचा समावेश होतो. त्यांचा नकारात्मक स्वातंत्र्याच्या कल्पनेवर विश्वास नव्हता. त्यांचा सकारात्मक स्वातंत्र्याच्या कल्पनेवर विश्वास होता कारण सकारात्मक स्वातंत्र्यातूनच व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या कक्षा रुंदावतात; आपणास अभिप्रेत असणाऱ्या गोष्टीची प्राप्ती करणे शक्य होते, अशी त्यांची यामागची भूमिका होती. जगातील सर्व लोकांबद्दल मनात प्रेमभाव बाळगणे व आपल्या वैयक्तिक प्रेमाच्या कक्षा रुंदावत त्यात सर्व माणसांचा समावेश करणे म. शिंदे यांना अभिप्रेत होते.

म. शिंदे यांच्या धर्मसाधनेत व्यक्तीचा विकास करीत असताना चित्तशुद्धी करणे आणि विकासाचाच एक भाग म्हणून लोकांची सेवा करणे यांचा समावेश करण्यात आला होता. व्यक्तीच्या विकासात सौंदर्याभिरुचीचा विकास करणे महत्त्वाचे होते. कारण जीवनात आपण रसिकतेचे पोषण केले पाहिजे. प्रपंच व संसार म्हणजे बेडी नसून तो जगण्यात आनंद आहे. वैताग ही स्वाभाविक स्थिती नाही. संसारात किती हालअपेष्टा आल्या तरी आपल्यामध्ये जी साहजिक विनोदवृत्ती

असते तिला बाधा येऊ देऊ नये. लहान मुलांत उचंबळणारा आनंद, त्याचा कौतुकी स्वभाव आणि स्वाभाविक सहनशक्ती आपण होता होईतो कायम ठेवली पाहिजे.

आनंदाचा उदय स्नेहभावनेतून होतो. मित्राचा वियोग झाल्यावर स्नेहभावना शोकात परिवर्तित होते. टेनिसनला मित्राचा वियोग झाला. त्याचे त्यास खूप दु:ख झाले. शोक तर झालाच; पण त्यात क्रमाक्रमाने अतिगंभीर विचारजागृती होऊन हळूहळू थोर तत्त्वाचे दर्शन होऊ लागले. विरह उद्वेग, निराशा, विचार, शंका, आशा, श्रद्धा आणि शेवटी आनंद अशी त्याच्यामध्ये आध्यात्मिक अनुभवाची परंपरा निर्माण झाली. "ज्या मित्रावर आपण जीव की प्राण असे प्रेम केले तोच जणू आपल्या आकुंचित कुडीतून उडून जाऊन दशदिशा फाकला, जो आपल्या प्रेमाचा साठा आणि विनाशी विषय होता तो आता सर्वत्र पसरलेला आणि अनंतकाळ टिकणारा असा झाला." या भावनेतून त्यास आनंद मिळाला. मित्राचा वियोग झाल्यामुळे काही काळ आपण गडबडून जाऊ पण पुढे विवेकासहित आपल्यात वैराग्याचे बळ निर्माण होईल. सर्व जग आपला मित्र आहे असे आपणास वाटेल. आपली आकुंचित वृत्ती नष्ट होऊन आपणास आनंद होईल. असे सुखवादी झालो म्हणजे आपण ईश्वरभक्त झालो असे म्हणावयाचे. म्हणून म. शिंदे सांगतात की यासाठी आपण स्नेहसंबंधाचे वलय सतत वाढवीत नेणे गरजेचे आहे.

स्नेहसंबंधातून माणसास आनंद होतो. त्याचप्रमाणे मनात रसिक वृत्तीची जोपासना करणे महत्त्वाचे आहे. साहित्य, कला, संस्कृती व सृष्टीसौंदर्य हे अक्षय आनंदाचे निधान आहे. त्यामुळे समोरच्या परिस्थितीच्या संदर्भात निराश न होता आपण स्वत:स हीन न मानता आनंदी वृत्तीने आपण प्रयत्न केले पाहिजेत. त्यातूनच आपणास खरा आनंद मिळेल आणि आपले मन प्रसन्न होईल, असे म. शिंदे यांचे मत होते. त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण आनंदवादी होता. अंत:साधनेच्या मदतीने आपल्या चित्ताची शुद्धी करणे आणि कर्तव्ये पूर्ण करण्यासाठी समाजाची सेवा करणे आणि त्या द्वारा मनाची प्रसन्नता ठेवणे ही त्यांच्या मते धर्माची त्रिसूत्री होती. त्यांना व्यक्तिगत उन्नतीपेक्षा समाजाची उन्नती जास्त महत्त्वाची वाटत होती. कारण समाजाच्या उन्नतीतूनच व्यक्तीची उन्नती होते असे त्यांचे मत होते.

धर्म आणि नीती हा त्यांचा आवडीचा विषय होता. धर्माचा प्रश्न व्यक्तीच्या अंत:साधनेशी व नीतीचा प्रश्न समाजाच्या व्यवहारांशी जोडलेला आहे. भोवतालची परिस्थिती सदोष आहे म्हणून आपण निराश होऊन गप्प न बसता निर्धाराने आणि

आनंदी वृत्तीने त्यात बदल करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत असे त्यांचे सांगणे होते. केवळ व्यक्तीची पूर्णावस्था वा मुक्ती महत्त्वाची नाही. कारण एक व्यक्ती मुक्त झाल्यावर समाजाचे कल्याण होणार नाही म्हणून आपण प्रथम समाजाची पूर्णावस्था प्राप्त करणे आणि त्याच्या मदतीने पुन्हा व्यक्तीची पूर्णावस्था प्राप्त करण्यासाठी झटले पाहिजे. त्यांनी नैतिक व्यवहारात विवेकास व अंत:प्रामाण्यास महत्त्वाचे स्थान दिले.

धर्म व राजकारण यांच्या संबंधात विचार करण्यात म. शिंदे यांनी धर्माचा वापर राजकारणासाठी करू नये असे मत मांडले. महाराष्ट्रातील तथाकथित राष्ट्रवादी विचारांना त्यांनी विरोध केला. गणेशोत्सवास प्राप्त झालेला राजकीय रंग त्यांना आवडला नाही. आपल्या 'स्व'चा अतिरेक करणारी संकुचित अस्मिता जोपासणारी वृत्ती त्यांना मान्य नव्हती. भारतीय राष्ट्रवादाचा पाया संकुचित धर्मवादी विचारांवर उभा करणे त्यांना मान्य नव्हते. भारतात 'स्वराज्य' स्थापन झालेले त्यांना हवे होते. पण केवळ स्वराज्य स्थापन करून आपले काम होणार नाही. आपण आपल्या मनात आणि देशात 'स्वाराज्य' स्थापन करण्यासाठी झटले पाहिजे, असे त्यांचे मत होते. त्यांची स्वाराज्याची कल्पना टॉलस्टॉयच्या 'Kingdom of God'च्या जवळ जाते.

साहित्य, सौंदर्य कला आणि विज्ञान यांचा आपले जीवन समृद्ध करण्यामध्ये मोठाच उपयोग होतो. पण विज्ञानाला मानवविद्येवर आपले वर्चस्व गाजविता येणार नाही असे त्यांचे मत होते. कितीही म्हटले तरी विज्ञानाचे नियम मोघम असतात आणि मानवी जीवनातील ज्ञानाचा असा भाग असतो; ज्याबाबत विज्ञान आपणास मदत करू शकत नाही. पण मानवी जीवन जास्त सुखकारक करण्यात, सत्याचा शोध घेण्यात विज्ञानाचा आपणास नेहमीच उपयोग होणार आहे.

ब्राह्म समाज, उदारमतवाद, प्रार्थना समाज यांच्या धर्मविषयक विचारांचा म. शिंदे यांनी विकास केला. त्यांचा ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास होता पण ईश्वर त्यांना गूढ पारलौकिक सुख प्राप्त करण्यासाठी नको होता. त्यांच्या दृष्टींने धर्माची साधना इहलोकात महत्त्वाची होती. मानवी जीवनात श्रद्धा आवश्यक आहे. ती श्रद्धा खऱ्या अर्थाने नैतिक पायावर उभी करावी आणि तिचा माणसाच्या व समाजाच्या विकासासाठी उपयोग करावा असे त्यांचे सांगणे होते. परमेश्वर सर्वसमर्थ आणि अनंत आहे. आम्ही सांताहून सांत आहोत म्हणून जीवन जगत असताना आपल्या मनात विनम्रतेची भावना असली पाहिजे. धर्मसाधना करीत असताना मानवी जीवन अंतर्बाह्य विकसित करणे आपले कर्तव्य आहे. कला,

साहित्य, सौंदर्य आणि विज्ञान यांचा जीवन अर्थपूर्ण व आनंदमय करण्यात मोलाचा वाटा आहे, पण हे सर्व करीत असताना मार्दव, ऋजुता व विनम्रता यांना धारण करणे आवश्यक आहे. मानवी जीवनातील धर्मश्रद्धा माणसास सर्वांगांनी उन्नत करू शकेल असे त्यांचे मत होते.

प्रा. दि. के. बेडेकर यांनी 'धर्मश्रद्धा : एक पुनर्विचार' या पुस्तकात आधुनिक जीवनात धर्मप्राय श्रद्धेचा पुनर्लाभ होणे कसे आवश्यक आहे याचा विचार केला होता. त्यांच्या मते प्राचीन समाजात यातुप्रधान धर्माचा उदय झाला. यातुप्रधान धर्मातून पुढे एकेश्वरी धर्माचा उदय झाला. पण आधुनिक काळात विज्ञान व तत्त्वज्ञान यांच्या वाढत्या प्रभावामुळे एकेश्वरी धर्माचा अस्त झाला. धर्माच्या अस्ताबरोबरच धर्मश्रद्धेचा अस्त झाला. मानवी जीवनात पोकळी निर्माण झाली. मानवी जीवनातील ही पोकळी दूर करण्यासाठी धर्मप्राय श्रद्धेचा पुनर्लाभ होणे गरजेचे आहे. हा पुनर्लाभ धर्मश्रद्धा व राष्ट्रवाद यांच्या द्वारा प्राप्त होणार नाही. मानवजातीची समूहता, एकात्मता जर साध्य होणार असेल तर ती एक नव्या श्रद्धेच्या साक्षीनेच साध्य होऊ शकेल. ती श्रद्धा सर्वांची होईल तेव्हा ती साकार होईल. विज्ञान व कला यांनी निर्मिलेल्या 'मानुष' विश्वावरील श्रद्धा मानवांना अशी ग्वाही देऊ शकते की हे 'मानुष' विश्व मानवी जीवनाला, प्रयत्नांना, सर्जनांना अर्थवत्ता देणारे आहे. मानवांची एकात्मता हे 'मानुष' विश्वावरील श्रद्धेचे फार मोठे व प्रभावी अंग आहे. आता मानवजातीने आपले ज्ञात स्थान ओळखून विश्वाच्या वास्तवात विज्ञानाच्या व कलेच्या साह्याने रमले पाहिजे. विज्ञानाची जिज्ञासावृत्ती व कलेची सहृदय वृत्ती त्यात अपेक्षित आहे. माणसाची विश्वावरील नवी श्रद्धा, आपल्या वृत्तींना उत्तेजित करणारे व सफल करणारे हे विश्व आहे ही श्रद्धा या विश्वाशी नाते जोडून आपण जे मानुष विश्व निर्माण करीत आहोत ते विश्व संवादी आहे ही ग्वाही माणसाला मनोमन मिळाली पाहिजे. ही ग्वाही एकटे विज्ञान, एकटी कला देऊ शकत नाही तर ती ग्वाही केवळ श्रद्धा देऊ शकते. या नव्या श्रद्धेचे महत्त्वाचे अंग मानवी समूहाची एकात्मता हे आहे.

प्रा. बेडेकर यांनी मानवी विकासातील धर्माचे महत्त्व ओळखले होते. माणूस आपल्या अस्तित्वाचा विचार करीत असताना आपल्या सांततेचा अनुभव घेतो. त्या बरोबर या सांततेत त्यास आपल्या उन्नयनाचे स्वातंत्र्य ही अनुभवास येते. आपल्या ज्ञानाची सांतता त्यास कळते. विश्वाचा गूढतेचा प्रत्यय मानवी प्रज्ञेस येतो. या प्रत्ययातून मानवी मनात अतीव नम्रतेचा उदय होतो. नव्या संदर्भात विज्ञान, कला, मानवी समूहाच्या एकात्मतेची जाणीव आणि विराट विश्व व मानुष

विश्व यांना सांधणारी मानवी कर्तृत्वशक्ती धर्मप्राय श्रद्धेचा आपणास पुनर्लाभ करून देईल असे प्रा. बेडेकर यांचे मत होते.

म. शिंदे यांनी मानवी जीवनातील धर्मश्रद्धेचे स्थान ओळखळे होते. ज्या वेळी म. शिंदे धर्मावर आपले विवेचन करीत होते. त्या वेळी एकेश्वरी धर्माचा अस्त झालेला नव्हता पण तो अस्ताकडे वाटचाल करीत आहे याची शिंद्यांना जाणीव झाली होती. प्रा. बेडेकरांना ५० वर्षांच्या ऐतिहासिक अनुभवाचा लाभ झालेला होता. बेडेकरांचा दृष्टिकोण मार्क्सवादी होता आणि धर्मप्राय श्रद्धेचा पुनर्लाभ नव्या सामूहिक समाजवादी मानवी एकात्मतेच्या संदर्भात प्राप्त व्हावा असे त्यांचे मत होते. म. शिंदे ईश्वरवादी होते. ईश्वराला केंद्रस्थानी ठेवूनच त्यांनी धर्मविषयक विचार मांडले. पण ईश्वरवादाचा अपवाद वगळता अनेक बाबतीत म. शिंदे यांचे विचार प्रा. बेडेकर यांच्या जवळ जातात. प्रा. बेडेकर यांना अभिप्रेत असणारा नैतिक व्यवहार कसा असावा याचे विवेचन अत्यंत प्रत्ययकारकरीत्या म. शिंदे यांनी केले आहे. ईश्वर त्यांना अंत:प्रामाण्यासाठी हवा आहे. बाह्य धर्मसाधनेसाठी नव्हे. म्हणून त्यांनी मनाची अखंड प्रसन्नता व आनंदी वृत्ती म्हणजेच मोक्ष असा विचार मांडला. त्यामुळे याबाबत म. शिंदे व बेडेकर यांच्या विवेचनातील साधर्म्य महत्त्वाचे आहे.

धर्माच्या स्वरूपाचे विवेचन करीत असताना मार्क्सने धर्मसमीक्षेचे महत्त्व प्रतिपादन केले होते. कारण धर्म शोषण व विषमताग्रस्त समाजात सांत्वना देण्याचे ऐतिहासिक कार्य करीत असतो. वर्गसमाजातील विषमतेचे निराकरण करण्यासाठीच शोषितांच्या नव्या चळवळी उभ्या राहतात. पर्यायी धर्मश्रद्धा उभा करतात. आपल्या भागवत धर्माच्या विकासात म. शिंदे यांनी त्यांचे विवेचन केलेले आपणास दिसते. भांडवलशाही व्यवस्थेत मानवी जीवनात परात्मभाव निर्माण होतो. व्यक्तीचे जीवन व समाजजीवन दुभंगते. धर्माच्या साह्याने त्यास एकसंध करता येत नाही. मार्क्सच्या मते शोषण दमनशून्य समाजवादी समाजातच हा परात्मभाव दूर होईल. प्रेम व सहकार्य यांच्या आधारावर एकात्म समाजावादी समाज निर्माण होईल. शिंदे यांच्या धर्मविवेचनाचे वैशिष्ट्य असे की त्यांनी माणसांना विभाजित करणारे समाजवास्तव ओळखले होते. या विषमतेची कारणमीमांसा करून समाजवादी क्रांतीची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली नाही पण नवा समताधिष्ठित समाज स्थापन करावयाचा असेल तर त्यात धर्माची काय भूमिका असेल याचे त्यांनी विवेचन केले. विज्ञान, कला व सौंदर्य याबाबतचे त्यांचे विवेचन म्हणून महत्त्वाचे आहे. भारतातील धर्मसुधारणा चळवळीने जी

धर्मसमीक्षा सुरू केली त्यांत अशा प्रकारे म. शिंदे यांनी मोलाची भूमिका बजावली. त्यांची भूमिका ईश्वरवादी असली तरी त्यांच्या धर्मविषयक विचारांतून समाजाचे विकासक्रम आणि लोकशाहीकरणाची प्रक्रिया बरीच पुढे जात होती. म. शिंदे यांचे हे कार्य म्हणूनच ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१. प्रा. गो. मा. पवार (सं), म. वि. रा. शिंदे यांची रोजनिशी.

२. प्रा. मा. प. मंगुडकर (सं), शिंदे लेखसंग्रह.

३. म. वि. रा. शिंदे, धर्म, जीवन व तत्त्वज्ञान, भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न.

४. भास्कर भोळे, म. वि. रा. शिंदे यांचे बहुजनवादी राजकारण.

५. प्रा. ए. वाय. जाधव, म. वि. रा. शिंदे यांचे सामाजिक व राजकीय विचार (पी.एम. प्रबंध)

6. Prof. Shiva Prabha Ghugare, Maharshi Shinde and renaissance in Western India.

7. M. S. Gore, Maharshi V. R. Shinde, An Assessment of his Contribution.


❑❑❑

124308
31.3.08

I. I. A. S. LIBRARY

Acc. No.

This book was issued from the library on the date last stamped. It is due back within one month of its date of issue, if not recalled earlier.

CP&SHPS—519-I.I.A.S./2004-25-6-2004-20000.

# आमची इतर प्रकाशने

- जोतीबा फुले आणि स्त्री-मुक्तीचा विचार
  डॉ. गेल ऑम्व्हेट — २० रु.
- महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य
  प्रा. तानाजी ठोंबरे — २० रु.
- महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ
  डॉ. अशोक चौसाळकर — २० रु.
- जोतीरावांची समता-संकल्पना
  भास्कर लक्ष्मण भोळे — २० रु.
- महात्मा फुले आणि सांस्कृतिक संघर्ष
  भारत पाटणकर — २० रु.
- महात्मा फुले आणि धर्म
  प्रा. आ. ह. साळुंखे — २० रु.
- डॉ. आंबेडकर यांचे राजकीय विचार
  प्रा. म. द. देशपांडे — २० रु.
- डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय चळवळी
  कृष्णा मेणसे — २० रु.
- महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे
  आणि सांस्कृतिक विचार
  पी. डी. दिघे — रु.

Library IIAS, Shimla
MR 922.94 Sh 63 C
00124308

- म. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या
  राजकीय व सामाजिक चळवळी
  तानाजी ठोंबरे — ३० रु.
- विठ्ठल रामजी शिंदे यांचे बहुजनवादी राजकारण
  भा. ल. भोळे — ५० रु.

---

मूल्य : ३० रुपये

ISBN 81-88284-04-1